# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, सोमवार, दिनांक १९ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२७ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## शिंदेकडून अडीच वर्षे महापौरपदाचा भाजपाला प्रस्ताव : मंत्री बावनकुळे





**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाला. या महापालिकांच्या निवडणुकीत मुंबईत भाजपा-शिंदे सेनेच्या युतीला मोठं यश मिळालं, तर ठाकरे बंधूंना मोठा धक्का बसला. यानंतर आता मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून मोठ्या घडामोडी सुरू आहेत.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेच्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये ठेवलं आहे. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेने भाजपाकडे अडीच-अडीचवर्षे महापौरपदाचा प्रस्ताव ठेवल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात आहे. या चर्चांवर आता भाजपाचे नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

'शिंदेंच्या सेनेकडून असा कोणताही प्रस्ताव दिलेला नाही', असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे.चंद्रशेखर बावनकुळे काय म्हणाले ?मुंबई महापालिकेत अडीच-अडीचवर्ष महापौर व्हावा अशी मागणी शिंदेंच्या शिवसेनेने केली आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला.

यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आमच्या पार्लमेंट्री बोर्डाकडे अशी कोणतीही मागणी आलेली नाही. आमच्या पार्लमेंट्री बोर्डाची बैठक होईल, आमच्या महायुतीच्या समन्वयक समितीमध्ये एकनाथ शिंदे देखील आहेत, अजित पवार देखील आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री चर्चा होईल.

कोणी काय मागणी केली ? यावर देखील चर्चा होईल.

तसेच एकनाथ शिंदे यांना काही चर्चा करायची असेल तर ते थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करतील , असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

## महाराष्ट्र राज्यगीताच्या प्रेरणादायी सुरांनी दुमदुमली झ्युरिकची भूमी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**

**झ्युरिक, दि. १८ :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचे वर्ल्ड इकोनॉमिक फोरमसाठी आज झ्युरिक येथे आगमन झाले. ५ दिवसांच्या आपल्या या दौऱ्यासाठी येताच मराठमोळ्या पद्धतीने त्यांचे उत्स्फूर्त पद्धतीने स्वागत करण्यात आले. पारंपरिक वेश, पारंपरिक पद्धती आणि पारंपारिक उत्साहात मराठीजनांनी केलेल्या स्वागताबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. महाराष्ट्राचे राज्यगीत सुद्धा यावेळी सादर झाले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दावोस येथे आगमन होताच मराठी भाषिक नागरिकांनी त्यांचे मराठमोळ्या पद्धतीने ओवाळून स्वागत केले. स्वित्झर्लंडमधील भारताचे राजदूत मृदुलकुमार यांनी देवेंद्र फडणवीस यांचे प्रारंभी स्वागत केले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि किंजारापू राम मोहन नायडू यांनीही देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. मार्गात आणि इतरही नागरिकांनी त्यांची भेट घेतली तेव्हा प्रत्येक जण महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत मिळालेल्या दणदणीत यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करत होता. एकूणच महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीची धूम तेथेही पाहायला मिळाली. बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून झालेल्या कार्यक्रमात 'स्वागत देवाभाऊ' असा फलक लागला होता.

'बृहन्महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंड'तर्फे आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण झाले. राज्यात आपण महा-एनआरआयफोरम तयार केला असून, त्या माध्यमातून स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषेला नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे सांगितले. कोणत्याही प्रगतीचा मूलभूत विचार हा सांस्कृतिक वैभव जपण्याचा असतो. त्यातूनच भौतिक प्रगती साध्य होत असते. आता मुंबईच्या विकासाचे आणखी ठोस नियोजन आपण हाती घेतले असून पुढच्या ५ वर्षात विकसित राष्ट्रांच्या राजधानींपेक्षा आपली मुंबई अधिक प्रगत असेल. कोणत्याही देशात जा, तेथे मराठी माणूस आज प्रगती करतो आहे. मेहनती आणि विश्वासार्ह हीच त्याची ओळख आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे समन्वयक अमोल सावरकर यांनी आज झ्युरिक येथे मराठी मंचाने स्वित्झर्लंडमधील विविध शाळांमध्ये मराठी भाषेचा वर्ग सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतल्याचे सांगितले. या उपक्रमाचे कौतुक मुख्यमंत्र्यांनी केले.

## वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२६ साठी मुख्यमंत्री फडणवीस दावोसकडे रवाना

### 'मॅग्नेटिक महाराष्ट्र'द्वारे जागतिक पातळीवर भारताच्या विकासगाथेचा गजर



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**

महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा वेग अधिक वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी दावोस, स्वित्झर्लंडकडे रवाना झाले आहेत. या परिषदेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

जागतिक व्यासपीठावर भारताचे विकास इंजिन म्हणून 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अधिक बळकट करण्याचा निर्धार असून जग या नव्या 'महा-ग्रोथ' गाथेकडे अपेक्षेने पाहत आहे. महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल अधिक वेगवान करण्यासाठी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२६ महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

गेल्यावर्षी १६ लाख कोटींचे गुंतवणूक करार महाराष्ट्राने केले होते. यावर्षी अधिक गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले आहे. दावोस येथे होणाऱ्या या परिषदेदरम्यान जागतिक उद्योगसमूह, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट विदेशी गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

## मुंबईच्या महापौरपदासाठी पडद्यामागे जोरदार हालचाली

### शिंदेंच्या शिवसेनेचे नगरसेवक ठाकरे गटाच्या संपर्कात, 'मातोश्री'वर फोनाफोनी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला यश मिळाले असले, तरी काठावरचे बहुमत मिळाले आहे. त्यामुळे मुंबईचा महापौर कोणाचा होणार ? यावरून कमालीची गुप्तता आणि रस्सीखेच पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खबरदारीचा उपाय म्हणून आपल्या सर्व २९ नगरसेवकांना वांद्रे येथील 'ताज लँडसब एन्ड' या पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे. भाजप नेते देवेंद्र फडणवीस सध्या दावोस दौऱ्यावर असताना मुंबईत मोठा 'दगाफटका' होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचदरम्यान, एकनाथ शिंदेंचे काही नगरसेवक ठाकरे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून मुंबईच्या राजकारणात पुन्हा उलथापालथ होणार का याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. बीएमसी निवडणुकीत भाजपने ८९ जागांवर विजय मिळवला असून, त्यांना ११४ हा बहुमताचा आकडा गाठण्यासाठी





शिंदे गटाच्या २९ नगरसेवकांची मदत अनिवार्य आहे. हीच संधी साधून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून भाजपसमोर अडीच-अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव ठेवला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच 'जर देवाची इच्छा असेल तर मुंबईचा पुढचा महापौर आपलाच असेल,' असे सूचक वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी करून राजकीय वतुर्ळात खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या विधानामागे अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

'द न्यू इंडियन एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार, शिंदे गटाचे काही नवनिर्वाचित नगरसेवक उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. या नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांच्या अत्यंत विश्वासू व्यक्तीला फोन करून, 'आमच्या मनात उद्धवजी आणि आदित्य ठाकरे यांच्याबद्दल कोणतेही वैर नाही,' असे स्पष्ट केल्याचे समजते. या गुप्त वाटाघाटींची कुणकुण लागताच उपमुख्यमंत्री शिंदेंनी तातडीने आपल्या नगरसेवकांची रवानगी हॉटेलमध्ये केली असून, महापौर निवडीपर्यंत त्यांना तिथेच ठेवले जाणार आहे.

**पडद्यामागे बऱ्याच गोष्टी घडतायत -राऊत**

दरम्यान, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील आजच्या पत्रकार परिषदेत अनेक सूचक विधाने केली आहेत. ते म्हणाले, 'मुंबईचा महापौर शिवसेनेचा किंवा ठाकरे बंधुंचा व्हावा, यापेक्षा भाजपचा होऊ नये ही सगळ्यांची भावना आहे. देवाची इच्छा असेल, शिवसेनेचा महापौर बसू शकतो, असे उद्धव ठाकरे यांनी काल सांगितले. काल मी सकाळी राज ठाकरेंची भेट घेतली. दोन्ही भावांमध्ये मोबाईलवरून चर्चा झाली. अनेकांशी चर्चा सुरू आहे. आम्ही सध्या तटस्थपणे या सगळ्या हालचालींकडे पाहत आहोत, पण पडद्यामागे बऱ्याच गोष्टी घडत आहे,' असा दावा संजय राऊत यांनी केला.

संजय राऊत म्हणाले, 'शिंदे गटातील निवडून आलेल्या नगरसेवकांमध्ये बरेच नवीन चेहरे आहेत. ते मूळचे शिवसैनिकच आहेत. शिवसैनिकाच्या मनात मुंबईबद्दल वेगळी भावना आहे. त्यामुळे भाजपचा महापौर होऊ देऊ नये, असे सगळ्यांच्या मनात विचार असल्याचे आमच्या लक्षात आलेले आहे. नगरसेवकांना कितीही कोंडून ठेवले, तरी संपर्काची अनेक साधने असतात, त्यानुसार संदेश येतच असतात.'

## 'महायुती'तील मित्रपक्षांत ठिणगी

### पराभूत भाजप उमेदवाराचे घर जाळण्याचा प्रयत्न

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नाशिक, दि. १८ :**

महानगरपालिका निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर राज्यात ठिकठिकाणी राजकीय वादाच्या घटना समोर येत आहेत. नाशिकमध्ये विजयाचा जल्लोष करताना एका भाजप उमेदवाराच्या घरावर हल्ला करून आग लावण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तर दुसरीकडे, नागपुरात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या एकमेव नगरसेविका आभा पांडे यांनी भव्य रॅली काढत विरोधकांना प्रत्युत्तर दिले आहे.नाशिक महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १६ मध्ये राजकीय वाद विकोपाला गेला आहे. येथील शिवसेना शिंदे गटाच्या नवनिर्वाचित नगरसेविका पूजा नवले आणि त्यांच्या समर्थकांवर गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच प्रभागातील भाजपच्या पराभूत उमेदवार पुष्पा ताजनपुरे यांनी उपनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पुष्पा ताजनपुरे यांच्या दाव्यानुसार, विजयाची रॅली काढत असताना नवले यांच्या कार्यकर्त्यांनी ताजनपुरे यांच्या घरात शिरून अश्लील कृत्य केले आणि घरावर ज्वलनशील पदार्थ फेकून आग लावण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी नवनिर्वाचित नगरसेविका पूजा नवले, त्यांचे पती प्रवीण नवले यांच्यासह १५ ते २० संशयित समर्थकांवर गुन्हा दाखल केला आहे.

**एकटी लढली अनब जिंकली, आभा पांडेंचे शक्तीप्रदर्शन**

नागपूर महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाला मोठा धक्का बसला असला तरी, प्रभाग २१ मधून निवडून आलेल्या आभा पांडे यांनी पक्षाची अब्रू राखली आहे. आज त्यांनी शांती नगर परिसरातून भव्य 'आभार रॅली' काढून मतदारांचे आभार मानले.

रॅली दरम्यान बोलताना आभा पांडे म्हणाल्या की, 'माझ्या विरोधात स्थानिक आमदारांनी हिंदी भाषक कार्ड आणि पैशांचा वारेमाप वापर केला होता. मात्र, जनतेने माझ्या कामावर विश्वास दाखवला. अजित पवार यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला होता, तो मी सार्थ ठरवला आहे. आता यापुढेही जनतेच्या प्रश्नांसाठी मी कटिबद्ध राहीन.

## सोलापूर महामार्गावर भीषण अपघात

### चालकाचा ताबा सुटल्याने कार झाडावर आदळली अक्कलकोटला निघालेल्या ५ मित्रांचा जागीच मृत्यू

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**

**पुणे, दि. १८ :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी रात्री उशिरा एक हृदयद्रावक घटना घडली आहे. अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारला भीषण अपघात झाला असून, यामध्ये ५ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मोहोळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देवडी पाटीजवळ रात्री साडेअकराच्या सुमारास हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल (जि. रायगड) येथून सहा मित्र एर्टिगा कारने (क्रमांक चक-४ब४५३६) अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघाले होते. शनिवारी (१७ जानेवारी २०२६) रात्री ११:३० च्या सुमारास ही कार मोहोळ जवळील देवडी पाटी परिसरात आली असता, चालकाचा वाहनावरील ताबा अचानक सुटला. भरधाव वेगातील ही कार महामार्गापासून सुमारे १० ते १५ फूट दूर झुडपांमध्ये जाऊन एका मोठ्या झाडावर जोरात आदळली. हा अपघात एवढा भीषण होता की, कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. धडकेचा आवाज ऐकून आसपासच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. कारमध्ये ३ पुरुष आणि ३ महिला असे एकूण ६ प्रवासी होते. यापैकी ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह वाहनामध्ये पूर्णतः अडकलेल्या अवस्थेत होते. या अपघातातून ज्योती जयदास टाकले (रा. सेक्टर ७, पनवेल) या महिला सुदैवाने बचावल्या आहेत. घटनेची माहिती मिळताच मोहोळ पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने कारमध्ये अडकलेल्या मृतदेहांना बाहेर काढण्याचे काम सुरू केले. जखमी ज्योती टाकले यांना तात्काळ उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, मोहोळ येथे दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. रात्रीची वेळ आणि वेगाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा भीषण अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

## निवडणुकीत ५२.९६ टक्के नागपूरकरांनी सर्वच उमेदवारांना नाकारले

**नागपूर :** नागपूर महापालिका निवडणुकीत मतदारांचा असंतोष ठळकपणे समोर आला असून, शहरातील तब्बल ५२.९६ टक्के नागपूरकरांनी थेट किंवा अप्रत्यक्षपणे सर्वच उमेदवार आणि विद्यमान निवडणूक व्यवस्थेला नकार दिला आहे. अयोग्य प्रभाग रचना, उमेदवारांची गुणवत्ता आणि राजकीय कार्यपद्धतीबाबत असलेल्या नाराजीमुळे हा संदेश दिला गेल्याचे चित्र आहे.निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार ४७.४ टक्के मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला, तर ४.७९ टक्के मतदारांनी 'नोटा' (छेपश ेष ींहश अर्लेींश) या पर्यायाचा वापर करून सर्व उमेदवारांना स्पष्ट नकार दिला. या दोन्ही आकड्यांची बेरीज पाहता, बहुसंख्य नागपूरकरांनी सध्याच्या राजकीय पर्यायांवर विश्वास नसल्याचे अधोरेखित झाले आहे.महापालिका निवडणूक ही स्थानिक स्वराज्य संस्थेची सर्वात महत्त्वाची लोकशाही प्रक्रिया मानली जाते.

## अरुण गवळींच्या कन्या योगिता गवळींचा मुंबईत पराभव

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, मुंबई, दि.१८ :** मुंबईच्या महापौरपदाबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच, 'डॉन' अरुण गवळी यांची कन्या योगिता गवळी यांना मात्र या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. या निकालानंतर त्यांचे पती आणि प्रसिद्ध अभिनेता अक्षय वाघमारे यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत योगिता यांच्या जिद्दीचे व त्यांनी दिलेल्या लढ्याचे मनापासून कौतुक केले आहे. पराभवाने खचून न जाता योगिता यांनी केलेल्या कष्टाचा आणि जनसेवेचा आपल्याला अभिमान असल्याचे अक्षयने या पोस्टमध्ये नमूद केले आहे.



योगिता यांना भाजपचे उमेदवार रोहिदास लोखंडे यांच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला. योगिता यांच्या पराभवानंतर त्यांचे पती अभिनेते अक्षय वाघमारे यांनी पोस्ट लिहिली आहे. ते म्हणाले, प्रिय बायको, सर्वप्रथम तुझे मनापासून आभार आणि मला तुझा प्रचंड अभिमान आहे. प्रेग्नन्सी आणि त्यानंतर अवघ्या एका महिन्याच्या मुलीची आई असताना, एवढी मोठी जबाबदारी खांद्यावर घेऊन तू ज्या धैर्याने ही निवडणूक लढवलीस, ते खरंच थक्क करणारं आहे. पुढे अक्षय लिहितात, सत्ताधारी असो किंवा विरोधक, भाजप, शिंदे गट, ठाकरे गट किंवा मनसे...कोणाच्याही तुलनेत वैयक्तिक पातळीवर तुला सर्वाधिक ६३०० मतं मिळाली. तुझ्या आसपासही कुणी नाही, हे तू पुन्हा एकदा सिद्ध केलं आहेस. मम्मी, पप्पा, तू आणि अखिल भारतीय सेनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी केलेल्या प्रामाणिक कष्टाची ही पावती आहे. भायखळ्याच्या जनतेनं तुला भरभरून प्रेम दिलं. हे प्रेम पाहून स्पष्ट होतं की, लोकांसाठी तू आधीच निवडून आली आहेस. जनतेनं जातीपातीच्या राजकारणापेक्षा तुझ्या कामावर अनब विकासावर विश्वास ठेवला आहे. गेल्या काही महिन्यांत तू घेतलेले कष्ट आणि तुला होणाऱ्या वेदना मी जवळून पाहिल्या आहेत.

## रोजगार समन्वयासाठी 'महिमा' ची स्थापना राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

### तरूणांना मिळणार जगभरातील रोजगार संधी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**

जगभरातील विविध देशातील रोजगारासंबंधी समन्वय आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतिशीलता आणि क्षमता संस्था ( महिमा) स्थापन आणि कार्यान्वित करण्यास शनिवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तरूणांना विविध देशातील रोजगार उपलब्धता आणि संधी यांची माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे. महाराष्ट्रात सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रामध्ये मिळून एक हजारहून अधिक शिक्षण तसेच प्रशिक्षण संस्थांचे विस्तृत जाळे आहे. कृषि आणि संलग्न क्षेत्रे, उद्योग, बांधकाम, आरोग्य, आतिथ्य, लॉजिस्टिक्स, बँकिंग, तसेच सेवा इ. क्षेत्रांत लक्षावधी कुशल कामगार तयार होत आहेत. विकसित देशांतील रोजगाराच्या उपलब्ध संधी, देशात मिळणाऱ्या वेतनाच्या तुलनेत मिळणारे जादा वेतन या कारणांमुळे मागील काही वर्षापासून भारतीय युवा वर्गाचा कल आंतरराष्ट्रीय रोजगाराकडे वाढत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील कामगार आणि विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. केरळ, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या राज्यांनी परदेशातील रोजगारासंबंधी प्रभावी समन्वय तसेच अंमलबजावणीसाठी एकछत्री शिखर संस्था स्थापन केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था स्थापन आणि कार्यान्वित करण्यास आज मान्यता देण्यात आली. अर्थ आणि सांख्यिकी संचालनालय आता आयुक्तालय अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाच्या १ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाचे नाव बदलून अर्थ आणि सांख्यिकी आयुक्तालय असे करण्यासही मान्यता देण्यात आली. वित्त विभागाने दिलेल्या सूचनेनुसार अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयातील कामकाजाचा तसेच मंजूर पदांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार अर्थ आणि सांख्यिकी संचालनालयाची ९९६ पदे आणि २१२ वाढीव पदे, जिल्हा नियोजन समित्यांची ५७६ पदे, सहआयुक्त ( नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय यांच्या कार्यालयासाठी ६६ पदे, वैधानिक विकास मंडळाची ५१ पदे अशा एकूण १ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास आज मान्यता देण्यात आली.

## प्रजासत्ताक दिनापासून विरार चर्चगेट मार्गावर वाढणार एसी लोकलच्या फेऱ्या

**वसई, दि. १८ :** पश्चिम रेल्वे मार्गावरील विरार रेल्वे स्थानक एक गजबजलेले रेल्वे स्थानक आहे. गेल्या काही काळात वसई, विरार आणि नालासोपारा शहरात मुंबई, ठाणे, पालघर यासह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून आणि देशातील गुजरात, उत्तरप्रदेश, उत्तराखंड आणि बिहारसारख्या राज्यातून मोठ्या प्रमाणावर लोकांचे स्थलांतर झाले आहे.मुंबई-अहमदाबादमहामार्गावर असणारी कोंडी, विरार ते ठाणे, मुंबई आणि पालघर शहरांतर्गत नसणारी बस सेवा, तसेच खाजगी वाहतूक सेवांकडून आकारले जाणारे भरमसाठ भाडे यामुळे बहुतांश प्रवासी लोकलने प्रवास करणे पसंत करतात. जलद प्रवास आणि तिकिटाच्या परवडणाऱ्या किंमती यामुळे दैनंदिन हजारो प्रवासी लोकलने प्रवास करतात.तर वर्षभरापूर्वी सुरू झालेल्या एसी लोकलमुळे लांब पल्ल्याचा तसेच भर उन्हाळ्यात लोकल प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास काहीसा सुखकर झाला आहे. पण, वाढती गर्दी आणि एसी लोकलच्या कमी फेऱ्या यामुळे विरारहून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एसी लोकलने प्रवास करताना प्रचंड गर्दीचा सामना करावा लागत होता. तसेच काहींना नाईलाजाने एसी लोकलऐवजी दुसऱ्या लोकलने प्रवास करावा लागत होता. त्यामुळे रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने एसी लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी केली जात होती.

## एकनाथ शिंदेंच्या नगरसेवकांना हॉटेलमध्ये का ठेवले?

### विरोधकांचे आरोप फेटाळत शीतल म्हात्रेंनी स्पष्टच सांगितले

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवले असले, तरी हे बहुमत काठावरचे असल्याने राजकीय वतुर्ळात 'घोडेबाजारा'ची चर्चा सुरू झाली आहे.

फोडाफोडीच्या भीतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आपल्या २९ नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे. महापालिकेत महापौर आणि स्थायी समिती सभापती यांसारखी महत्त्वाची पदे मिळवण्यासाठी आपली 'बार्गेनिंग पॉवर' वाढवण्याचा हा एक भाग असल्याचे बोलले जात आहे. या अनपेक्षित हालचालीमुळे आगामी काळात सत्तास्थापनेसाठी

**संजय राऊतांवरही टीका**



महायुतीमध्ये अंतर्गत रस्सीखेच होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या सर्व घडामोडींवर राजकीय वतुर्ळात भुवया उंचावल्या गेल्या असताना, शिवसेना शिंदे गटाच्या महिला प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी या कृतीमागचे नेमके कारण स्पष्ट करत विरोधकांचे दावे खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

नवख्या नगरसेवकांसाठी हॉटेलमध्ये शिबिर शीतल म्हात्रे म्हणाल्या, आम्ही महायुती म्हणून लढलो आणि जिंकलो आहोत, पाठीत खंजीर खुपसण्याची आमची भूमिका नाही.

आम्ही महायुती म्हणूनच सत्तेत येणार आहोत. तसेच नगरसेवकांना हॉटेलवर ठेवण्यात आल्यासंदर्भात त्या म्हणाल्या, आमचे जवळपास २० नगरसेवक नवखे आहेत, त्यांना मनपाचे कामकाज माहित नाही. त्यामुळे त्यांच संदर्भाने दोन दिवसीय शिबिर घेतले आहे.

त्यासाठीच हे नगरसेवक हॉटेलमध्ये आहेत. हे उबाठाच्या नगरसेवकांना हरवून आले आहेत, असेही म्हात्रे म्हणाल्या. इतकेच नव्हे तर महायुती ही बाळासाहेब यांनी केलेली नैसर्गिक युती आहे. बार्गेनिंग पॉवर वाढवण्यासाठीचा हा विषय नसल्याचेही म्हात्रे यांनी स्पष्ट केले आहे.

## चंद्रपूरच्या अलीची गुजरात येथे अखिल भारतीय सागरी जलतरणात झेप

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१८ :** जन्मजात गहन श्रवणबाधा असतानाही जिद्द, चिकाटी आणि संवेदनशील नेतृत्वाच्या पाठबळावर चंद्रपूरच्या अली मुहम्मद रियाझखान घौरी या विशेष बालकाने अखिल भारतीय स्तरावर प्रेरणादायी यश संपादन केले आहे. गुजरात राज्यातील पोरबंदर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय ५ कि.मी. सागरी जलतरण स्पर्धेत अलीने द्वितीय क्रमांक मिळवत चंद्रपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विशेष म्हणजे राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून काही महिन्यांपूर्वी या बालकावर कोक्लिअर प्रोसेसर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर अलीच्या आत्मविश्वासाला भरारी मिळाली आणि आता त्याने आपली क्षमता सिद्ध केली.अली हा द्विपक्षीय कोक्लिअर इम्प्लांट केलेला विशेष बालक आहे. सन २०२३ मध्ये त्याच्या एका साऊंड प्रोसेसरमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड झाल्याने तो पूर्णपणे बंद पडला होता. इयत्ता १० वीच्या महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यावर असताना एका प्रोसेसरवर शिक्षण, दैनंदिन जीवन आणि क्रीडा सराव करणे अलीसाठी अत्यंत कठीण झाले. साऊंड प्रोसेसरची किंमत लाखोंमध्ये असल्याने कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले होते.शासकीय योजनांमध्ये कोक्लिअर इम्प्लांटनंतर पुन्हा साऊंड प्रोसेसर देण्याची तरतूद नसतानाही, ही बाब मानवीय आणि अपवादात्मक असल्याचे ओळखून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी खनिज निधी अंतर्गत विशेष बाब म्हणून सुमारे सात लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून दिला. या निधीतून अलीसाठी नवीन साऊंड प्रोसेसर उपलब्ध झाला आणि त्याचे थांबलेले आयुष्य पुन्हा गतीमान झाले.

# नगरसेवकांची पळवापळवी होऊ नये यासाठी काँग्रेसकडून खबरदारी

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१८ :** चंद्रपूर महानगरपालिकेत महापौर निवडीच्या पार्श्वभूमीवर नगरसेवकांची पळवापळवी किंवा फोडाफोडीचे प्रकार घडू नयेत, यासाठी काँग्रेस पक्षाकडून विशेष खबरदारी घेतली जात असल्याची माहिती समोर येत आहे.सत्ता स्थापनेच्या निर्णायक टप्प्यावर कोणताही अनपेक्षित धक्का बसू नये, यासाठी काँग्रेस नेतृत्व पूर्णपणे सतर्क झाले आहे.

महापौर पदासाठी काँग्रेस व मित्र पक्षाची आवश्यक जुळवणी शक्य असले तरी, राजकीय दबाव, आर्थिक आमिषे आणि क्रॉस वोटिंगची शक्यता लक्षात घेऊन पक्षाने संरक्षणात्मक रणनीती अवलंबली आहे. काही नगरसेवकांना सुरक्षित व गोपनीय ठिकाणी ठेवण्यात आले असून, त्यांच्या हालचालींवर पक्षातील वरिष्ठ नेते थेट लक्ष ठेवून आहेत, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षांतर्गत गटबाजी आणि महापौर पदासाठी इच्छुकांची वाढती संख्या यामुळे धोका वाढू शकतो, अशी नेतृत्वाची भावना आहे. त्यामुळे नगरसेवकांशी सतत संवाद, विश्वास निर्माण करण्याचे प्रयत्न आणि संघटनात्मक शिस्तीवर भर देण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठका सुरू असून, महापौर पदाचा उमेदवार अंतिम करण्यासाठी उच्चस्तरीय निर्णय अपेक्षित आहे. नगरसेवक एकत्र ठेवून पक्षातील एकजूट दाखवण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून करण्यात येत आहे, असेही सांगण्यात येत आहे.दरम्यान, काँग्रेसच्या या हालचालींमुळे चंद्रपूरच्या राजकारणात चांगलीच खळबळ उडाली असून, विरोधी पक्षांकडूनही प्रत्येक घडामोडीवर बारकाईने नजर ठेवण्यात येत आहे. महापौर निवडीच्या दिवशी काँग्रेसची ही खबरदारी कितपत परिणामकारक ठरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### महापौर आरक्षणाच्या प्रतीक्षेत राजकीय पक्ष

महापौर पदासाठी कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षण राहणार, याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. आरक्षण जाहीर होईपर्यंत महापौर पदासाठीची थेट नावे समोर येत नसली, तरी अंतर्गत पातळीवर जोरदार तयारी सुरू असल्याचे चित्र आहे.महापौर पदाचे आरक्षण हे सत्तास्थापनेसह नेतृत्व ठरवणारे असल्याने काँग्रेस, भाजप तसेच इतर पक्षांमध्ये हालचाली वाढल्या आहेत. आरक्षण महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग की खुल्या प्रवर्गासाठी जाहीर होते, यावर पुढील राजकीय गणिते अवलंबून आहेत.काँग्रेसकडे सध्या संख्याबळाचा वरचष्मा असल्याने महापौर पद आपल्याकडेच राहील, असा पक्षाचा दावा आहे. मात्र आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी राहते, यावर उमेदवारांची अंतिम नावे ठरणार आहेत.

### आ.वडेट्टीवार व खा.धानोरकर यांच्या गोटातील महापौर होण्यासाठी दोघांची धडपड



चंद्रपूर महानगरपालिकेत सत्ता स्थापनेच्या प्रक्रियेला वेग आला असतानाच काँग्रेसमधील दोन प्रमुख गटांमध्ये महापौर पदासाठी तीव्र चढाओढ सुरू झाली आहे. आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गोट्यातील उमेदवार महापौर व्हावा, यासाठी दोन्ही नेत्यांकडून जोरदार हालचाली सुरू असल्याचे चित्र आहे.महापौर पद हे केवळ प्रशासकीय नव्हे तर पुढील विधानसभा व लोकसभा राजकारणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे मानले जात असल्याने, दोन्ही गट हे पद आपल्या प्रभावाखाली ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे काँग्रेसमध्ये अंतर्गत बैठका, नगरसेवकांशी थेट संवाद आणि रणनिती आखण्याचे सत्र सुरू आहे.सूत्रांच्या माहितीनुसार, आ. वडेट्टीवार गटाकडून अनुभवी व संघटनात्मक ताकद असलेल्या नगरसेवकाच्या नावाला पुढे करण्यात येत आहे, तर खा.धानोरकर गटाकडून नव्या चेहऱ्याला संधी देत पक्षात नवे नेतृत्व उभे करण्याचा आग्रह धरला जात आहे. या दोन भिन्न दृष्टिकोनांमुळे पक्षांतर्गत मतभेद उघड होताना दिसत आहेत.दरम्यान, काँग्रेसच्या या अंतर्गत धडपडीकडे विरोधी पक्ष बारकाईने लक्ष ठेवून आहेत. काँग्रेसमधील गटबाजीचा फायदा घेण्याचा प्रयत्न होतो का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.अखेर महापौरपदाचा उमेदवार कोणाच्या गोट्यातून पुढे येतो, वरिष्ठ पातळीवर तोडगा काढला जातो का, की अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र होतो.याकडे चंद्रपूरच्या राजकारणाचे लक्ष लागले आहे.

### भाजपाचे हालचालींकडे लक्ष

भाजपही आरक्षणाकडे डोळे लावून बसला असून, अनुकूल आरक्षण मिळाल्यास सत्तास्थापनेत चमत्कार घडवण्याच्या आशेने हालचाली सुरू ठेवल्या आहेत. संख्याबळ कमी असले तरी रणनीती आखण्यात भाजप मागे नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.दरम्यान, महापौर आरक्षण जाहीर होण्यास विलंब होत असल्याने नगरसेवकांमध्ये उत्सुकता वाढली असून, शहराच्या राजकारणात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतरच महापौर पदासाठीची स्पर्धा अधिक तीव्र होणार असून, खरी राजकीय चढाओढ तेव्हाच सुरू होईल, असा तर्क आहे.

## भाजपाच्या पराभवात बंडखोरांचा मोठा वाटा - आ.किशोर जोरगेवार

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१८ :** नुकत्याच पार पडलेल्या चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला पराभव स्वीकारावा लागला असून, या पराभवामागे पक्षातील बंडखोर उमेदवारांचा मोठा वाटा असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रसार माध्यमांशी बोलतांना सांगितले.निवडणूक निकालानंतर त्यांनी प्रतिक्रिया देताना भाजपातील अंतर्गत गटबाजी व शिस्तभंगावर उघडपणे बोट ठेवले.



आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, अनेकांनी बंडखोरी करत अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. याचा थेट फटका पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना बसला. अनेक प्रभागांमध्ये मतविभाजन झाले आणि त्याचा फायदा विरोधकांना झाला.'

भाजपाचे जवळपास १३ माजी नगरसेवक या निवडणुकीत पराभूत झाले.तसेच ३१ बंडखोर उमेदवार उभे झाले.पॅरेलल पॅनलमूळे भाजपाच्या उमेदवारांना मोठा फटका बसला.गुन्हेगारी प्रवृत्तीला अप्रत्यक्ष पाठबळ दिले जात असल्याचा चुकीचा मतप्रवाह पक्षाला महागात पडल्याचे आ.जोंरगेवारांनी बोलतांना सांगितले.तसेच दारुबंदी व दारु दुकानसंदर्भातील विधानाचा फटका सुध्दा भाजपाला बसला असल्याचे आ.जोरगेवार म्हणाले.

भाजपाच्या प्रचारात मोठ्या नेत्यांच्या सभा, रोड शो आणि शक्तिप्रदर्शन झाले असले तरी स्थानिक पातळीवरील असंतोष आणि बंडखोरीने या सगळ्या प्रयत्नांवर पाणी फेरले.अनेक प्रभागांत बंडखोर उमेदवारांना मिळालेली मते ही निर्णायक ठरल्याचेही त्यांनी सांगितले.भाजपाच्या पराभवावर आता पक्षांतर्गत आत्मपरीक्षण सुरू झाले असून, बंडखोरांवर कारवाई होणार का, की संघटनात्मक बदल करण्यात येणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रीय योगासन स्पर्धेत आर्टिस्टिक पेअरमध्ये महाराष्ट्र आघाडीवर

### अनुभूती निवासी स्कूलमध्ये राष्ट्रीय योगासन स्पर्धा रोमांचक

युवराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**चिमूर दि.१८ :** अनुभूती स्कूल मध्ये सुरू असलेली राष्ट्रीय योगासना स्पर्धा रोमांचक स्थितीत असून आर्टिस्टिक पेअरमध्ये महाराष्ट्र राज्याचा संघ आघाडीवर आहे?. त्यासोबत आर्टिस्टिक एकल मध्ये पश्चिम बंगाल, आर्टिस्टिक ट्रेडिशनल मध्ये सीआयएससी कौन्सील बोर्ड पुढे आहे. शरीर, श्वास आणि साधनेचा अद्वितीय दर्शन स्पर्धक घडवित आहे, या स्पर्धतुन आज अंतिम विजेत्या ठरणार आहे.



अनुभूती निवासी स्कूलमध्ये सुरू असलेली मुलींची १७ वर्षाखालील ६९ वी नॅशनल स्कूल गेम्स राष्ट्रीय योगासन स्पर्धेत ३३ संघ राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी अनुभूती निवासी शाळेत आले आहेत. त्यात १६७ खेळाडू सहभागी झाले आहेत. स्कूल गेम्स फेडरेशन च्या स्पर्धेत आर्टिस्टिक सिंगल, ट्रेडिशनल सिंगल, आर्टिस्टिक पेअर, रिदमिक पेअर या चार प्रकारात योगासनाची विविध आसने सादर करत आहेत.सीआयएससीईचे सहसचिव अर्जित बासू, व्यवस्थापक अर्णव शॉ, विभागीय स्पोर्टस समन्वयक सिद्धार्थ किर्लोस्कर, मुख्य पंच डॉ. आरती पाल, एसजीएफआयचे मुख्य निरीक्षक रितू पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली जैन स्पोर्टस अकॅडेमी चे रवींद्र धर्माधिकारी, सय्यद मोहसीन, अजित घारगे, वरुण देशपांडे, किशोर सिंग सिसोादिया, घनश्याम चौधरी, उदय सोनवणे, अब्दुल मोहसीन, जयेश बाविस्कर, योगेश धोंगडे, मोहम्मद फजल, प्रवीण ठाकरे, कुलदीप राहुल निंभोरे, समीर शेख यांच्यासह सहकारी यशस्वीतेसाठी प्रयत्न करत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून ब्रम्हपुरी तालुक्यातील विविध विकास कामाची पाहणी

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१८ :** जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी ब्रह्मपुरी तालुक्यातील विविध विकासकामांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षण केले. यावेळी ब्रम्हपुरीच्या उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, तहसीलदार सतीश मासाळ, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ब्रह्मपुरी शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर असून, कामामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे निदर्शनास येताच जिल्हाधिकारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित यंत्रणांनी तात्काळ काम पूर्ण करावे, तसेच धुळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशा स्पष्ट सूचना कार्यकारी अभियंता व संबंधित कंत्राटदारांना देण्यात आल्या.यानंतर मौजा ब्रह्मपुरी ते आरमोरी रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी करण्यात आली. सदर काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी असमाधान व्यक्त करून, विहित कालमर्यादेत काम पूर्ण करण्याचे निर्देश कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण) जया ठाकरे, उपविभागीय अभियंता अजय चहांदे व संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना दिले. त्यानंतर मौजा उदापूर येथे माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आग लागलेल्या इथेनॉल प्लांटला भेट देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यात आली. यावेळी सुरक्षा व्यवस्थेबाबत आवश्यक खबरदारी घेण्याबरोबरच, परिसरातील लगतच्या गावांतील नागरिकांच्या आरोग्याला कोणताही धोका निर्माण होणार नाही, यासाठी योग्य उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

## जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सवाचा समारोप

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१८ :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्यावतीने जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सव २०२५-२६ चे आयोजन ७ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले. जिल्ह्यातील शासकीय तथा निमशासकीय बालगृहातील मुलांचा शारीरिक व मानसिक विकास व्हावा तसेच इतर मुलांसोबत स्पर्धा करण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी चाचा नेहरू बालमहोत्सव घेण्यात आला. बक्षीस वितरण सोहळा नुकताच पार पडला.

पोलिस फुटबॉल मैदान येथे रंगलेल्या तीन दिवसीय कबड्डी, खो-खो, गोळा फेक, धावणे, रिले, कॅरम, बुद्धिबळ, निबंध, वक्तृत्व, वादविवाद, नृत्य, गायन आदी जिल्हास्तरीय स्पर्धांचे बक्षीस वितरण मुख्य न्याय दंडाधिकारी प्रशांत कुळकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माविमचे जिल्हा समन्वयक अधिकारी प्रदीप काठोळे, बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रकाश भांदककर, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बासरकर, सदस्या भावना देशमुख, ज्योत्स्ना मोहितकर, ॲड. मनिषा नखाते, वनिता घुमे, संरक्षण अधिकारी कविता राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिक्षणाचे मूल्य वाढविण्यासाठी पदवीला कौशल्याची जोड आवश्यक

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१८ :** एखाद्या विषयातील पदवी ही विद्यार्थ्याची शैक्षणिक योग्यता दर्शवते; मात्र त्या पदवीला कौशल्याची जोड मिळाल्यासच विद्यार्थी खऱ्या अर्थाने रोजगारक्षम बनतो, असे प्रतिपादन राज्यपाल महोदयांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले.एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई अंतर्गत महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर ( विद्यापीठाचे बल्लारपूर उपकेंद्र) येथे शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी भेट दिली. यावेळी विद्यार्थिनींशी विशेष संवाद साधताना ते बोलत होते.यावेळी त्यांच्यासोबत माननीय राज्यपालांचे अतिरिक्त परिवार प्रबंधक श्री. रमेश येवले, बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले, सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड, आवार समन्वयक डॉ. वेदानंद अलमस्त आदी उपस्थित होते. या वेळी डॉ. नारनवरे यांनी वर्तमान शैक्षणिक स्थिती, चंद्रपूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी व विकासाच्या शक्यता यावर विद्यार्थिनींशी संवाद साधला.मार्गदर्शन करताना डॉ. प्रशांत नारनवरे म्हणाले की, एकेकाळी पदवीधारकाला समाजात विशेष दर्जा होता. विशिष्ट शाखेची पदवी म्हणजे रोजगाराची हमी असे मानले जात असे; मात्र आज 'पदवीधर बेरोजगार' हे कटू सत्य आहे. त्यामुळे केवळ पदवी असून चालणार नाही, तर त्या क्षेत्रातील कौशल्य आत्मसात करणे अत्यावश्यक आहे.ते पुढे म्हणाले की, चंद्रपूर जिल्हा वनसंपदेने नटलेला, इतिहासदृष्ट्या समृद्ध व नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण आहे. येथील मनुष्यबळ व येणाऱ्या रोजगार संधी लक्षात घेता जिल्ह्याचे भविष्य उज्ज्वल आहे. अशा समृद्ध जिल्ह्यात एसएनडीटी महिला विद्यापीठासारख्या संस्थेतून शिक्षण घेणे ही अभिमानाची बाब असून या भागातील विद्यार्थिनींनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा. तसेच शिक्षकांचा विद्यार्थ्यांवर मोठा प्रभाव पडत असल्याने प्राध्यापकांनी सतत अद्ययावत राहून स्वतःला सक्षम व स्वयंपूर्ण बनवावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी बल्लारपूर केंद्राच्या प्रगतीचा आढावा मांडला. कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षांत वाढलेली विद्यार्थिनींची पटसंख्या, शैक्षणिक दर्जा, अभ्यासक्रमासोबत राबविले जाणारे विविध उपक्रम आणि त्यामध्ये प्राध्यापकांचे योगदान त्यांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाचे संचालन प्रा. अपेक्षा पिंपळे यांनी केले तर आभार सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड यांनी मानले.

## मोबाईलच्या युगात मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे कौतुकास्पद

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१८ :** मोबाईलच्या युगात मैदानी खेळ व पारंपरिक संस्कृती मागे पडत आहे. अशा परिस्थितीत मैदानी कबड्डी स्पर्धा आयोजित करून आपली परंपरा जपली जात आहे, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. कार्यक्रमास्थळापर्यंत आमदार मुनगंटीवार यांची बैलबंडीवरून लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली. तसेच लाडूतुला करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अनेक वर्षांनंतर बैलबंडीवर बसण्याचा योग आल्याची भावना आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. प्रेमाने व आपुलकीने केलेल्या स्वागताबद्दल साखरवाहीतील कार्यकर्ते व ग्रामस्थांचे त्यांनी आभारही मानले.

चंद्रपूर तालुक्यातील साखरवाही येथे जगदंब क्रीडा मंडळ व जय बजरंग क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरुषांच्या भव्य कबड्डी सामन्यांचे उद्घाटन आ. श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महिंद्र गावंडे, श्रेयस भालेराव, ब्रिजभूषण पाझारे, अनिल डोंगरे, शोभाताई पिदूरकर, विनोद खापने, सुरेश सोयाम, सिद्धार्थ कवाडे, रामभाऊ कडुकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.आमदार मुनगंटीवार म्हणाले, '१९९५ ते २००९ मी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले. येथील नागरिकांनी मला कायमच प्रेम आणि आशिर्वाद दिले. त्यामुळे येथील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे निमंत्रण दिले, तेव्हा आनंदाने स्वीकारले. जवळपास पंधरा वर्षांनी आपल्याला भेटताना आनंद होत आहे. या गावाच्या सेवेसाठी कधीही आवाज द्या, तुमच्यासाठी धावून येईल. कारण १९९५ मध्ये तुम्ही निवडून दिले नसते तर मी आज शेतकऱ्यांचे, उपेक्षितांचे प्रश्न विधानसभेत मांडू शकलो नसतो.'

## संत जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त भव्य दोन दिवसीय गुणगौरव व समाज प्रबोधन महोत्सव उत्साहात संपन्न

युवराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**चिमूर दि.१८ :** तालुक्यातील मौजा शंकरपूर येथे श्री. संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक १३ व १४ जानेवारी २०२६ रोजी भव्य दोन दिवसीय गुणगौरव सोहळा व समाज प्रबोधन महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. या महोत्सवाचे आयोजन श्री. संताजी जगनाडे महाराज देवस्थान, शंकरपूर व श्री. संताजी तेली समाज मंडळ, शंकरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.



संत जगनाडे महाराजांनी आपल्या आयुष्यभर विषमतावाद, अंधश्रद्धा व अन्यायाविरुद्ध लढा देत समाजात समता, बंधुता व मानवता या मूल्यांचा प्रसार केला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठीच या महोत्सवात सामाजिक, धार्मिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.पहिल्या दिवसाचे कार्यक्रम महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, मंगळवार दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ग्रामसफाई व वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. सायंकाळी घटस्थापना करून गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. रात्री संताजी भजन मंडळ, शंकरपूर तसेच परिसरातील इतर भजन मंडळांचे भक्तिमय भजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.दुसऱ्या दिवसाचे कार्यक्रम बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ग्रामसफाई, रांगोळी सजावट व ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. ध्वजारोहण शरद निकुरे व रविंद्र राखडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर भजन कार्यक्रम झाले.

सकाळी ११ ते २ या वेळेत सप्तखंजेरी वादक, सत्यपाल महाराजांचे शिष्य ह.भ.प. प्रदिपपाल चौधरी महाराज यांचे जाहीर कीर्तन व समाज प्रबोधन कार्यक्रम संपन्न झाले. त्यांच्या कीर्तनातून सामाजिक समता, व्यसनमुक्ती, स्त्री-सन्मान व युवकांनी सामाजिक बांधिलकी जपावी, असा प्रभावी संदेश देण्यात आला.दुपारच्या सत्रात मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विठ्ठलराव निखुले, उद्घाटक डी.के.निकुरे, नायब तहसीलदार, चिमूर होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संताजी तेली समाज मंडळ, शंकरपूरचे अध्यक्ष अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले.

या कार्यक्रमाला साईशभाऊ वारजूकर (सरपंच, ग्रा.पं. शंकरपूर), धनराजभाऊ मुंगले (ओबीसी संघटक, महाराष्ट्र प्रदेश), योगेशभाऊ समरीत (संयोजक, महाराष्ट्र आरक्षण संघर्ष समिती, चंद्रपूर), सौ. भावनाताई बावनकर (माजी पं.स. सदस्या, चिमूर), घनश्यामजी डुकरे (जिल्हा उपाध्यक्ष, विदर्भ तेली समाज महासंघ), रामूजी सहारे (सचिव, ए.ते. समाज, भंडारा), सौ. सविताताई चौधरी (माजी सरपंच सदस्या, शंकरपूर), डॉ. परसरामजी नागोसे (अध्यक्ष, ए.ते. समाज, चिमूर), डॉ. चेतन बेलखोडे, भाऊरावजी बावनकर, बाळूजी नागोसे, सतिश देव्हारे, ईश्वरभाऊ डुकरे, सौ. वंदनाताई सहारे, प्रेमनाथ ठाकरे, वसंताजी चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिमूर तालुक्यातील पत्रकारांचा जळगाव येथे शेती अभ्यास दौरा

युवराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**चिमूर दि.१८ :** तालुक्यातील पत्रकारांनी जळगाव येथील जैन इरिगेशन सिस्टम्स येथे भेट देत आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास केला. ज्येष्ठ पत्रकार सुरेश डांगे यांच्या नेतृत्वाखाली व जैन इरिगेशनचे मीडिया प्रमुख देवेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यास दौरा पार पडला.

या दौऱ्यात पत्रकारांनी ड्रिप व मायक्रो-इरिगेशन, टिश्यू कल्चर, पाणी व्यवस्थापन व शाश्वत शेतीविषयी माहिती घेतली. केळीची राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जळगावमध्ये ३-९ केळी, आधुनिक तंत्रज्ञान व उद्योग यांचा संगम कसा साधला जात आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव पत्रकारांना मिळाला. जळगावमध्ये दरवर्षी सुमारे २०० एकर पडिक जमीन शेतीयोग्य बनवली जात असून, तसेच घऊ व औद्योगिक विकासासाठी २०० एकर जागा राखीव ठेवण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.हा अभ्यास दौरा पत्रकारांसाठी दृष्टीकोन बदलणारा आणि मार्गदर्शक ठरला, अशी प्रतिक्रिया सहभागी पत्रकारांनी व्यक्त केली.

दैनिक युवाराष्ट्र दर्शन
बेरोजगार युवकांचा मार्गदाता

# यवतमाळ जिल्हा

सोमवार, १९ जानेवारी २०२६



## वसतिगृह सुरू करण्यासाठी खाजगी इमारतींचे प्रस्ताव आमंत्रित

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्याबाबत कार्यपद्धती व नियमावली शासनाने निश्चित केली आहे. शहरात १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांचे वसतिगृह सुरू करण्याचा प्रस्ताव असून, यासाठी खाजगी इमारत भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहे. सदर वसतिगृहासाठी सुमारे ९ हजार २०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेली इमारत आवश्यक आहे. इमारतीमध्ये प्रति विद्यार्थी ४० चौ.फुट या प्रमाणे निवासी दालन, स्वयंपाकगृह, भोजन कक्ष, अभ्यासिका, वाचनालय, संगणक कक्ष, मनोरंजन व टीव्ही हॉल, गृहपाल निवास, कार्यालय, स्टोअर रूम, अभ्यागत कक्ष, स्नानगृह, स्वच्छतागृह तसेच पार्किंग व सायकल स्टँड आदी सुविधा असणे आवश्यक आहे. यवतमाळ शहरात सदर वसतिगृह सुरू करावयाचे असल्याने इच्छुक इमारत मालकांकडून खाजगी इमारत भाड्याने देण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### कमल उसरे यांचे निधन

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ



येथील मूळ रहिवासी कमल रामभाऊ उसरे यांचे आज रविवार (१८ जानेवारी) रोजी नागपूर येथे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्या ७५ वर्षाच्या होत्या. त्यांची दोन्ही मुले नागपूर येथे नोकरीत असल्याने त्या नागपूर येथे राहत होत्या. त्यांच्या पार्थिवावर मानेवाडा मोक्षधामात अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे प्रवीण व राहुल ही दोन मुले, स्नुषा शारदा आणि सीमा, मुलगी लीना अशोक बानोरे, जावई अशोक बानोरे, नातवंडे आणि बराच मोठा आप्त परिवार आहे.

### आज महिला लोकशाही दिन

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

महिलांच्या तक्रार निवारणासाठी जिल्हा महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित केला जातो. या महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार दि.19 जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित केला जातो. महिलांनी प्रथम या लोकशाही दिनात तक्रार दाखल करावी. सदर तक्रारीवर योग्य कारवाई झाली नसल्यास जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तालुकास्तरीय लोकशाही दिनात केलेले अर्ज व टोकन क्रमांकासह तक्रार सादर करावे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी आणि वैयक्तिक तक्रार किंवा निवेदने स्विकारले जाणार नाहीत, याची महिलांनी नोंद घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

# मंगळवारी 'सामूहिक आक्रोश मोर्चा'

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १८ जानेवारी

"मला जगायचं आहे..." असा आक्रोश कदाचित मृत्यूपूर्वी स्व. अनुष्का किरण पाटोळे हिने केला असेल मात्र तो आवाज शाळा प्रशासनाच्या संवेदनशून्य आणि दुर्लक्षित धोरणामुळे दाबला गेला. आज तोच दाबलेला आवाज न्यायासाठी आक्रोशाच्या स्वरूपात रस्त्यावर उतरवण्याचा निर्धार यवतमाळातील विविध सामाजिक संघटनांनी केला आहे. स्व.अनुष्का पाटोळे यांच्यावर झालेल्या अन्यायाचा निषेध करत, दोषींवर कठोर कारवाई आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी मंगळवार, २० जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता संविधान चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ भव्य 'सामूहिक आक्रोश मोर्चा' काढण्यात येणार आहे. हा मोर्चा सकल मातंग समाज, यवतमाळ यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येत असून




जिल्ह्यातील जवळपास ३० हून अधिक सामाजिक व जन संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. या मोर्चात सकल मातंग समाज संघटना, विदर्भ मातंग समाज संघटना, लहुजी शक्ती सेना, साहित्यरत्न कला सांस्कृतिक विकास फाउंडेशन, अण्णाभाऊ साठे स्मारक समिती, बँड असोसिएशन, लहु टायगर सेना, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन (न्यू दिल्ली), समता पर्व प्रतिष्ठान, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, शेतकरी चळवळ संघटना, यवतमाळ वकील संघटना, ग्राहक संरक्षण समिती यांच्यासह अनेक संघटना सहभागी होणार आहेत.

अनुष्काच्या मृत्यूनंतरही तिची अवहेलना थांबली नाही. पोस्टमार्टमसाठी मृतदेह गाडीच्या डिकीत कोंबून नेण्यात आल्याची घटना समाजमन सुन्न करणारी असून, ही केवळ एका विद्यार्थिनीची शोकांतिका नसून संपूर्ण व्यवस्थेवरचा गंभीर प्रश्न आहे. पैशांचा वापर व राजकीय सत्तेचा गैरवापर करून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप यावेळी आयोजकांनी केला.

पत्रकारांशी बोलतांना प्राध्यापक संजय वानखडे म्हणाले, "अनुष्काचा आवाज तिच्या जिवंतपणी दाबला गेला. आज तोच आवाज आम्ही संविधानिक मार्गाने, शांततेत पण ठामपणे रस्त्यावर उतरवणार आहोत. न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही."

यावेळी प्रा. यशवंत खंडारे, प्रा. संजय नाटकर, प्रा. नारायण वाघमारे, राजू इंगोले, दिनेश वाघमारे, नरेश बावणे, चंदन हातागळे, सतीश सकट, विक्की नाडे, चंदन खडसे, गजानन रणखांब, देविदास महाले यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. संघटनांच्या वतीने SIT मार्फत चौकशी, फास्टट्रॅक कोर्टात खटला चालविणे, दोषींवर कठोर कारवाई आणि पीडित कुटुंबाला तत्काळ न्याय देण्याची ठोस मागणी करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील अनेक वसतिगृहांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या सीसीटीव्ही, मूलभूत सुविधा अद्यापही उपलब्ध नसल्याने अशा सर्व वसतिगृहांची सखोल चौकशी करून दोषींवर दंडात्मक कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

"घटना घडल्यानंतर कॅमेरे लावणे ही दुर्दैवी बाब आहे. शासनाने व प्रशासनाने यापूर्वीच जबाबदारीने पावले उचलायला हवी होती," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. ही लढाई केवळ अनुष्कासाठी नाही, तर वसतिगृहांमध्ये शिक्षण घेत असलेल्या हजारो मुलींच्या सुरक्षित भविष्यासाठी आहे. आणखी कुठलीही 'अनुष्का' बळी जाऊ नये, यासाठी हा आक्रोश मोर्चा न्याय मिळेपर्यंत सुरू राहील, अशी ग्वाही आयोजकांनी दिली आहे.

# सराईत चोरटा गजाआड



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १८

शहरासह आजूबाजूच्या परिसरात घरफोडी आणि दुचाकी चोरीचा धुमाकूळ घालणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) उपविभाग पथकाने सिनेस्टाईल सापळा रचून अटक केली आहे. अक्षय दयाराम मसराम (२८, रा. नेताजी नगर, यवतमाळ) असे या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून चोरीचे नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी त्याच्याकडून ५ लाख ८८ हजार १०७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक १७ जानेवारी रोजी यवतमाळ उपविभागात पेट्रोलिंग करत असताना, सराईत गुन्हेगार अक्षय मसराम हा चोरीचा माल विकण्याच्या उद्देशाने जाम रोडवरील वन विभाग उद्यानाजवळ फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत घेराव घातला आणि संशयास्पद रित्या सुझुकी ॲक्सेस मोपेडवर फिरणाऱ्या अक्षयला ताब्यात घेतले

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांचे मार्गदर्शनात मनिष गावंडे, गजानन राजमल्लू, सै. साजीद, योगेश गटलेवार, प्रशांत हेडाउ, रूपेश पाली, योगेश डगवार, सचीन घुगे, निलेश राठोड, सुनिल पैठणे, आकाश सहारे, देवेंद्र होले, आकाश सुर्यवंशी सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# डांबरी रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## काही वर्षांपूर्वी करोडो रुपये खर्च करून केलेल्या रस्त्याचे काम पून्हा सुरू

•युवाराष्ट्र दर्शन पुसद तालुका प्रतिनिधी, दि. १८ जानेवारी

तालुक्यातील माळ पठारावरील मारवाडी फाटा ते रोहडा या डांबरी रस्त्याचे काम सुरू असून हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केल्या जात आहे. या रस्त्यावर जेसीबी मशीननेच माती मिश्रित गिट्टीचा थर आथरल्या जात असून कोणत्याही प्रकारची लेव्हल न करता त्यावर अतिशय तुरळक असे डांबर टाकून बारीक गिट्टीचा चुरा टाकण्यात येत आहे. मारवाडी फाटा ते मारवाडी गावाकडे जाणारा रस्ता अशाच दर्जाचा बनविण्यात येत असल्याने मारवाडी येथील गावकऱ्यांनी तो रस्ता बंद पाडला आहे. म्हणून त्या पुढच्या



रस्ता करणे चालू आहे परंतु हाही रस्ता अतिशय निष्कृष्टपणे बनविल्या जात आहे. याबाबत मारवाडी वरोडा येथील नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद येथे योग्य ती चौकशी करून इस्टिमेट नुसार रस्ता बनविण्यास ठेकेदारास सांगावे अशा प्रकारचे निवेदन दिनांक 16 जानेवारी रोजी दिले आहे. रस्ता योग्य न बनविल्यास गावकऱ्यांनी शांततेत आंदोलन करावे लागेल किंवा उपोषणास बसावे लागेल असे निवेदनात नमूद केले आहे. मागील काही वर्षांपूर्वी करोडो रुपये खर्च करून मारवाडी फाटा ते पांढूंना केदारलिंग पर्यंतचा रस्ता बनविण्यात आला होता त्या रस्त्याबाबतही गावकऱ्यांनी वारंवार तक्रारी करून सुद्धा तो रस्ता थातूरमातूर केल्यामुळे या रस्त्यावर सर्वत्र खड्डेच खड्डे पडले आहेत. तोच रस्ता पुन्हा तशाच प्रकारे बनविल्या जात असून यावर संबंधित विभाग व लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष होत असल्याने हा ही रस्ता थातुरमातुर बनविल्या जात आहे. माळ पठारावरील बेचाळीस गावातील रस्ते अशाच प्रकारे थातुरमातूर बनवून केवळ बिले काढण्यात येत असल्याची ओरड नागरिकांतून होत असून याबाबत सर्वत्र संताप व्यक्त केल्या जात आहे

**आधीच निधी अभावी ठेकेदार लोक काम करत नाहीत रस्ता खराब होत असेल तर आम्ही लक्ष देऊन हा रस्ता चांगला बनवून देतो. या रस्त्याची संबंधित ठेकेदार हा चांगल्या कामासाठी प्रसिद्ध आहे.**
**-उमाकांत गंगाराम कांबळे**
**उपविभागीय अभियंता**
**सा.बां.उपविभाग पुसद**

# आर्णी शहरात हरभऱ्याची मागणी वाढली

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. १८ जानेवारी

आर्णी शहरात सध्या हिरव्या हरभ-याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून, हातगाडीवर हरभरा विक्रेत्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. नवाळीचा हिरवा हरभरा असल्याने चारचोघेजण हातात हरभरा घेवून मोठया शोकानी खात असून घरी सुध्दा घेवून जात असल्याने सध्या हिरव्या हरभ-याची मागणी सर्वाधिक वाढल्या मूळे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर हिरवा हरभरा खरेदी होत आहे. शहरातील चौका चौकांत तसेच बाजारपेठेत हातगाडीवर विक्रीला असणाऱ्या हिरवा हरभरा घेण्यासाठी ग्राहकांची सकाळ पासून तर सायकाळ पर्यंत गर्दी



राहते,नवळीचा हरवा हरभरा कमी दरात, ताजे व चविष्ट मिळत असल्याने नागरिकांचा कल स्थानिक विक्रेत्यांकडे वाढत आहे. या वाढत्या मागणीमुळे हातगाडी विक्रेत्यांना रोजगाराचा आधार मिळत असून, त्यांचा रोजचा व्यवसाय समाधानकारक सुरू आहे. आगामी काळातही हरभ-याची मागणी कायम राहण्याची शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.

# अध्यक्षपदी शेख जब्बार यांची चौथ्यांदा वर्णी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. १८ जानेवारी

येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची (SMC) निवडणूक अत्यंत उत्साहात पार पडली. या निवडणुकीत शेख जब्बार यांची अध्यक्षपदी, तर शेख मोबीन शेख डोस यांची उपाध्यक्षपदी बहुमताने निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, शेख जब्बार यांची सलग चौथ्यांदा अध्यक्ष म्हणून निवड झाल्याने त्यांच्या कार्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ढाणकी नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. अर्चनाताई सुंदरकांता वासमवार आणि उपनगराध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे उपस्थित होते. यावेळी शाळा



समितीच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. अर्चनाताई वासमवार आणि उपनगराध्यक्ष दत्ता वानखेडे यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात नगरसेवकांचाही सन्मान करण्यात आला. यामध्ये रवी शंकर ढोबळे, प्रफुल चौरे, नफीसाबी शेख इमरान आणि स्वीकृत नगरसेवक संजय सलेवाड यांचा समावेश होता. यावेळी शाळेच्या अडचणी जाणून घेताना नगराध्यक्षा व उपनगराध्यक्षांनी, "शाळेच्या विकासासाठी व कोणत्याही अडचणीच्या काळात आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत," अशी ग्वाही दिली. समितीची नवी कार्यकारिणी नूतन कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष शेख जब्बार,उपाध्यक्ष शेख मोबीन शेख डोस ,शिक्षण तज्ञ शेख शाहरुख शेख अकील,सचिव शेख मुखीत शेख मुर्तुजा,शिक्षण प्रतिनिधी साजेदा इस्माईल तांबोळी,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख शाहरुख यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सचिव शेख मुखीत यांनी मानले. या निवडीबद्दल शेख जब्बार यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

शाळांमध्ये दुस-या वर्गाची मुलगी माहेरा फिरदोस यांनी 30 पर्यंत पाढे पाठ केले सर्वासमोर त्यांना ऐकविले. शिक्षणाकडे जब्बार भाईंची दक्षता आहे आणि त्यांनी शाळेला शिक्षणामध्ये खेळामध्ये व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये चांगली भूमिका बजावली यामुळेच जब्बार भाई यांची सलग चौथ्यांदा निवड करण्यात आली मी सर्वांचे आभार मानतो प्रमुख पाहुणे म्हणून नगरपंचायत ढाणकी अध्यक्ष अर्चनाताई वासमवार व तसेच उपाध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे व नगरसेवक त्यांचे सहकारी स्वीकृत सदस्य संजू सल्लेवाड या सर्वांचे आभार मानतो **-शेख जबार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष**

# कबड्डी स्पर्धेचा उद्घाटन सोहळा थाटात संपन्न

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. १८ जानेवारी

नृसिंह व्यायाम शाळा प्रणित नृसिंह स्पोर्टिंग क्लबवणी येथे दि.16 जानेवारीपासून भव्य कबड्डी स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. यावेळी उद्घाटक म्हणून शिवसेनेचे जिल्हा संघटक विजय बाबू चोरडिया तर अध्यक्ष म्हणून शिवाजी व्यायाम शाळेचे मा.अध्यक्ष प्रमोद निकुरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभाग क्रमांक 14 आणि 13 चे नवनिर्वाचित नगरसेवक सैफुर रहेमान, शंकर झिलपे, गुलाम रसुल रंगरेज,केशव नागरी पतसंस्थेचे सचिव अनिल आक्केवार, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रविण



झाडे, संजय पावडे, श्री नृसिंह स्पोर्टिंग क्लब चे अध्यक्ष कुणाल ठोंबरे, उपाध्यक्ष अनिकेत वाढई, सचिव ब्रिजेश निंदेकर,दादा राऊत, सुधाकर काळे, रमेश उगले, पुरुषोत्तम आक्केवार, परशुराम पोटे, विशाल ठोंबरे, धर्मेंद्र काकडे,क्रीडाप्रेमी, खेळाडू आणि मान्यवरांच्या उपस्थितीत वातावरण खेळभावनेने भारले गेले होते. उद्घाटनप्रसंगी विजय चोरडिया यांनी कबड्डी हा ग्रामीण भागातील पारंपरिक व ताकदीचा मैदानी खेळ असल्याचे सांगत युवकांनी खेळाकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे, असे आवाहन केले.

तसेच खेळातून शिस्त, संघभावना व जिद्द निर्माण होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.तसेच प्रवीण झाडेअनिल आक्केवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### उद्घाटनपर सामन्यात नृसिंह स्पोर्टिंग क्लब संघाचे दमदार प्रदर्शन

उद्घाटनपर झालेल्या धरारक सामन्यात नृसिंह स्पोर्टिंग क्लब संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत विजय मिळवला. सामन्यात नृसिंह स्पोर्टिंग क्लब आणि कोंढा या दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. मात्र अखेर नृसिंह स्पोर्टिंग क्लबने उत्कृष्ट आक्रमण व भक्कम बचावाच्या जोरावर सामना आपल्या नावावर केला. 16 जानेवारीपासून सुरू झालेल्या या कबड्डी स्पर्धेत विविध संघ सहभागी होत असून आगामी सामने अधिक रंगतदार ठरण्याची अपेक्षा क्रीडाप्रेमींमधून व्यक्त होत आहे. सामने यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

# गोदावरी अर्बन आर्णी शाखेचा नववा वर्धापनदिन उत्साहात

## वृद्धाश्रमात भोजनदान; शासकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि १८ जानेवारी

सहकार क्षेत्रात विश्वासार्हता जपणारी व सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेली गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., नांदेड, आर्णी शाखा यांचा नववा वर्धापनदिन दि. १६ जानेवारी २०२६ रोजी विविध सामाजिक उपक्रमांसह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वर्धापनदिनाचे औचित्य साधून स्व. मातोश्री सुशीलाबाई वृद्धाश्रम, आर्णी येथे वृद्धांना भोजन देऊन सामाजिक बांधिलकी जोपासण्यात



आली. गोदावरी अर्बन ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता समाजोपयोगी उपक्रमांत सातत्याने पुढाकार घेणारी संस्था असल्याचे यावेळी दिसून आले.

संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील, संस्थेच्या अध्यक्षा राजश्रीताई पाटील, संचालक, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, उप महाव्यवस्थापक सुरेखा दवे, सहायक महाव्यवस्थापक विजय शिर्मेवार व रविजी इंगळे यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या वर्धापनदिनानिमित्त आयोजित सत्कार समारंभात तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी वाहूरवाघ, नायब तहसीलदार तुंडलवार, नवनिर्वाचित नगराध्यक्ष नालंदा भरणे, उपनगराध्यक्ष निलेश गावंडे, नगरसेवक अमोल मांगुळकर, शमी मलनस, आरिज बेग उपाध्यक्ष, महाराष्ट्र कॉंग्रेस, प्रतिष्ठित व्यावसायिक राजेश श्रीवास व सामाजिक कार्यकर्ते राजू इंगोले यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शहरातील विविध बँका व संस्थांचे शाखा व्यवस्थापक, गोदावरी अर्बनचे वरिष्ठ शाखा व्यवस्थापक राहुल कोल्हे, शाखा व्यवस्थापक योगेश वाटगुळे, सहाय्यक शाखा व्यवस्थापक राहुल पोदुटवार, सहाय्यक अधिकारी मिलिंद राठोड, अंकुश मांगूळकर, उमाकांत गीते, अंकुश राऊत, अक्षय बावणे, ऋतुजा गावंडे, अमोल रावते, श्रीनाथ गावंडे तसेच गोदावरी अर्बनचे दैनिक प्रतिनिधी /आवर्त प्रतिनिधी,ठेवीदार व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्धापन दिनाच्या शुभ प्रसंगी सामाजिक दायित्व जपत गोदावरी अर्बनने पुढील वाटचाल अधिक भक्कम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सामका आयुर्वेद येथे भव्य शिबिराचे आयोजन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १८ जानेवारी

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे हृदयरोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ताणतणाव, असंतुलित आहार, अपुरी झोप, व्यायामाचा अभाव, व्यसनाधीनता व मानसिक अस्वस्थता यामुळे हृदयाचे आजार लहान वयातही आढळत आहेत. या पार्श्वभूमीवर आयुर्वेद ही सुरक्षित, समग्र व परिणामकारक उपचार पद्धती ठरत आहे. मंगळवार दिनांक 20 जानेवारी ते 30 जानेवारी दरम्यान सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर, गोधनी, यवतमाळ येथे सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भव्य हृदयरोग निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये तज्ज्ञ वैद्यांच्या मार्गदर्शनाखाली नाडी परीक्षण, रोगनिदान, आहार-विहार मार्गदर्शन, योगासन, प्राणायाम तसेच आधुनिक जीवनशैलीतील धोके व त्यावरील उपाय यांचे सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

आयुर्वेद व हृदयरोग — शाश्वत उपचाराची दिशा आयुर्वेदामध्ये हृदयाला 'हृदयम् प्राणाधिष्ठानम्' असे संबोधले जाते — म्हणजेच प्राणशक्तीचे अधिष्ठान. आयुर्वेद केवळ लक्षणांवर उपचार न करता आजाराच्या मूळ कारणावर काम करतो. दोष संतुलन, रक्तशुद्धी, धमन्यांतील अडथळे कमी करणे, ताण-तणाव नियंत्रण, पचनशक्ती सुधारणा व मानसिक स्थैर्य या सर्व बाबी आयुर्वेदिक उपचारात समाविष्ट असतात. हृदयरोग प्रतिबंध व उपचारासाठी आयुर्वेदामध्ये: औषधी वनस्पती व औषधोपचार हृदयासाठी हितकर आहार योजना प्राणायाम व ध्यान पंचकर्म व शोधन चिकित्सा जीवनशैलीत आवश्यक बदल यांचा समन्वयाने उपयोग केला जातो. आजच्या काळात केवळ औषधांवर अवलंबून न राहता जीवनशैलीत बदल घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे. आयुर्वेद व योग ही जीवनशैली अंगीकारल्यास हृदय निरोगी ठेवणे, रक्तदाब नियंत्रण, कोलेस्ट्रॉल संतुलन व मानसिक आरोग्य सुधारणा शक्य होते. या शिबिरामध्ये पूर्व नोंदणी आवश्यक असून, अधिकाधिक नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवी सामका महिला बहुउद्देशीय संस्थेच्या सचिव सौ. चंदा पवार यांनी केले आहे. "हृदय निरोगी — जीवन निरोगी" या संकल्पनेनुसार हे शिबिर जनतेसाठी आरोग्यदायी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया
जिल्हा
सोमवार, १९ जानेवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# सालेकसा येथील लघु पाटबंधारे जि प विभाग कार्यालय वाऱ्यावर

## कार्यालयात सापडेना अधिकारी

**यशवंत शेंडे/ युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** महाराष्ट्राच्या टोकावर असलेला व पूर्व विदर्भातील आदिवासी तसेच छत्तीसगड मध्यप्रदेश सीमे लगत असलेला गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुका अति मागासलेला तालुका म्हणून ओळख आहे आज स्वातंत्र्याच्या ७६,वर्षानंतरही सालेकशाला कायमस्वरूपी उपविभागीय जलसंधारण अधिकारी मिळणार काय,असा संतप्त सवाल,केला जात आहे.




यापूर्वीचे तत्कालीन उपविभागीय जलसंधारण अधिकारी यशवंत बरडे हे चंद्रपूर जिल्ह्यातले रहिवासी आहेत व त्यांच्याकडे काही दिवस गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव अर्जुनी तालुक्याचा ही अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता व मोरगाव अर्जुनी ते सालेकसाच अंतर शंभर किलोमीटर अंतर असा प्रवास म्हणावा लागेल परंतु ते आता कायमचेच सालेकसा सह गोंदिया जिल्ह्यातूनच कार्यमुक्त झाले असून ते चंद्रपूर जिल्ह्यातच बदली करण्यात आल्याची सूत्रांकडून माहिती आहे सालेकसा तालुक्यात ४० ग्रामपंचायती असून जवळपास ९२ गावाचा समावेश आहे व मागील अनेक वर्षापासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे कामे या कार्यालयामार्फत प्रलंबित असून कित्येक कंत्राटदार हे त्रस्त झाले आहेत व काही तत्कालीन अधिकाऱ्यांनी कंत्राटदारकडून पैसे घेऊन साठे-लोटे झाल्याचेही चर्चेला उधाण आले असून प्रत्यक्षात बरेच काम बोगस झाले व काही कामे ब्लॉक लिस्ट मध्ये गेले असून येथे कायमस्वरूपी अधिकारी कनिष्ठ अभियंता नाही तसेच झालीया व पिपरिया जिल्हा परिषद क्षेत्राचे कनिष्ठ अभियंता चव्हाण व कारुटोला तथा तीरखेडी जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत कनिष्ठ अभियंता पुंडकर यांची प्रकृती बरी नसल्यामुळे ते सुद्धा गेल्या तीन महिन्यापासून कार्यालयात येत नाही आज घडीला एकच कनिष्ठ अभियंता सालेकसा येथे, कार्यरत आहे आज कार्यालय फक्त परिचराच्या भरोशावर चालत असून प्रत्यक्षात कामे जनतेचे होत नाही एकीकडे शासन म्हणतो की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार रोजगार हमी योजनेमार्फत १०० दिवसाच्या वर काम देणे बंधनकारक आहे परंतु शासनाचेच नियम धाब्यावर बसवून मजुरांना काम दिले जात नाही या कार्यालयामार्फत सिंचन विहीर मामा तलाव गावतलाव बोडी लपातलाव साठवण बंधारे असे विविध कामेही या कार्यालामार्फत केले जातात, सालेकसा येथे कायमस्वरूपी अधिकारी नसल्यामुळे गेल्या दोन ते तीन वर्षापूर्वी काम करण्यात आले परंतु त्यांचेही सुद्धा देयके व धनादेश आतापर्यंत कंत्राटदारांना मिळाले नाही ही सुद्धा सोकांतिका म्हणावा लागेल, सदर सालेकसा येथे कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी देण्यात यावा अशी मागणीही केली जात आहे.

**प्राप्त माहितीनुसार तत्कालीन उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांची बदली चंद्रपूर येथे झाल्याने त्यांच्या ऐवजी प्रभारी म्हणून मोरगाव अर्जुनीचे उपविभागीय अभियंता, यांची अतिरिक्त कार्यभार म्हणून सालेकशाकडे, पदभार देण्यात आला होता परंतु ते सुद्धा सालेकशाला येण्यास तयार नाहीत त्यामुळे पुन्हा सालेकसाचा कार्यालय परिचराच्या भरोशावर म्हणावा लागेल आधीच या कार्यालयात कनिष्ठ अभियंता कमी आहेत व दुसरीकडे वरिष्ठ अधिकारी नसल्यामुळे येथील काही कर्मचारी मनमर्जीने उशिरा येणे व लवकर कार्यालयातून निघून जाणे ही त्यांची सवय पडलेली आहे आदे केलेला महाराष्ट्र शासनाने पाच दिवसाचा आठवडा केलेला आहे हे मात्र विशेष.**

**या संदर्भात अधिक माहिती घेतली असता सालेकसा करिता उपविभागीय जलसंधार अधिकारी नसल्यामुळे खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे याबाबत देवरी आमगाव विधानसभेचे आमदार संजय पुराम यांना सुद्धा माहिती दिलेली आहे परंतु गोंदिया चे उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्याकडे येत्या आठवड्याभरात सालेकशाचा अतिरिक्त कार्यभार दिला जाईल शासनाकडून पदभरती केले जात नसल्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे.**
**–एस एम राऊत**
**जिल्हा संधारण अधिकारी लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद गोंदिया**

# वडेगाव येथील नवीन ग्रामपंचायत इमारतीचे थाटात लोकार्पण



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** तालुक्यातील ग्राम वडेगांव येथे काल १७ जानेवारी रोजी नवीन ग्रामपंचायत इमारतीचे लोकार्पण मोठ्या थाटात पार पडले.

या लोकार्पण सोहळ्याचे अध्यक्षस्थानी गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर हे होते. या नवीन वास्तूचे लोकार्पण आमदार संजय पुराम यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच अंजू बिसेन, देवरी पंचायत समितीचे सभापती अनिल बिसेन, गोंदिया जिल्हा परिषदेच्या सभापती सविता पुराम, गोटाबोडी जिल्हा परिषद गटाच्या सदस्य कल्पना वालोदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष सरपंच अंजु बिसेन यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, गट-तटाचे राजकारण न करता गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र आले. गावात अगोदर पाणी टंचाईची समस्या निर्माण होती आज सर्व हातपंपावर सोलर पंप बसवून गावाला पाणीटंचाई मुक्त केले. ही नवी इमारत ग्रामस्थांच्या सेवेसाठी अधिक सक्षम, सुसज्ज आणि पारदर्शक प्रशासन देण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. या कार्यक्रमाला उपसरपंच भोजराज पंधरे, सदस्य अशोक वाणी , विजय भोयर, सुषमा करचाल, रंजना नेवारे, जशोदा वाढिवे, हंसराज टेंभरे, पालिका राऊत आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहनाची दुचाकीला धडक

**गोंदिया :** सालेकसा पोलिस ठाण्यातंर्गत पानगाव ते रोढा मार्गावर वाहनाने दुचाकीला धडक देवून दुचाकीचालकास जखमी केल्याची घटना १६ जानेवारीची आहे. फिर्यादी रामेश्वर मोहरे यांचा नातेवाईक दुचाकी क्र. एमएच. ३५/एफडी. ८९२१ ने मित्रासोबत कावराबांध येथे जात असतांना वाहन क्र. एमपी ०७टीए १४९८ च्या चालकाने दुचाकीला धडक दिली. या धडकेत गौरव दसाराम मोहरे हे जखमी झाले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# रेती वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर कारावई

## १० लाखाचा मुद्देमाल जप्त

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** अर्जुनी मोरगाव पोलिस ठाण्यांतर्गत येरंडीदेवी ते बाक्टी मार्गावर अवैधरित्या विनापास परवाना रेतीची वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर कारवाई करून पोलिसांनी एकूण १० लाख ७ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. ही घटना १६ जानेवारीची आहे.




आरोपी दीपक अशोक चांदेवार व निखील अशोक उपरीकर दोन्ही रा. सासरा ता. साकोली याने ट्रॅक्टर क्र. एमएच. ३४/एपी १८७० तसेच ट्रॅक्टर क्र. एमएच ३६/एजी ३४४७ मध्ये विनापास परवाना रेती भरून वाहतूक करीत असतांना पोलिसांनी येरंडीदेवी ते बाक्टी मार्गावर दोन्ही ट्रॅक्टर पकडून एकूण १० लाख ७ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. फिर्यादी पोशि. चरणदास सावरकर यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# 'न्याय तुमच्या दारी' हा विधी सेवा महाशिबिराचा मुख्य उद्देश : न्यायमूर्ती ए. एस. किलोर

## जिल्ह्यातील न्यायालयीन अधिकारी कर्मचारी संघटनेचे केले कौतुक

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** 'न्याय तुमच्या दारी' हा विधी सेवा महाशिबिराचा मुख्य उद्देश असून या उद्देशाची फलश्रुती करून शेवटच्या नागरिकांपर्यंत न्याय पोहोचेल तसेच शासनाच्या योजनांचा लाभ मिळेल यासाठी शासनातील प्रत्येक यंत्रणांनी कटिबद्ध राहावे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती ए. एस. किलोर यांनी आज झालेल्या विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा या कार्यक्रमात केले. यावेळी त्यांनी गोंदिया जिल्ह्यातील न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी संघटनेचे कौतुकही केले.



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांचे निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गोंदिया, जिल्हा न्यायालय गोंदिया व जिल्हा प्रशासन गोंदिया यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्याचे आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सांस्कृतिक सभागृह येथे करण्यात आले. यावेळी न्यायमूर्ती ए. एस. किलोर बोलत होते. या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा गोंदिया जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती न्यायिक एम.डब्ल्यू. चांदवाणी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गोंदिया तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष आर. एन. जोशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम., पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव नरेश वाळके, जिल्हा वकिल संघाचे अध्यक्ष ?ड. टि. बी. कटरे यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे कार्यालयीन प्रमुख अधिकारी, स्थानिक वकील संघ, विधी कॉलेजची विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्यायमूर्ती किलोर पुढे म्हणाले, प्रत्येक भारतीय नागरिकाला संविधानाअंतर्गत मूलभूत अधिकार मिळालेले आहेत. मात्र, तळागाळातील नागरिकास ज्ञानाअभावी लाभ उचलता येत नाही. त्याकरिता अशा आयोजित महा शिबिराच्या माध्यमातून थेट नागरिकास लाभ होतो. या ठिकाणी शासनाच्या विविध विभागाचे दालन आहेत, ही आनंदाची बाब आहे. शासनाच्या विभागांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविल्याने अशा कार्यक्रमांना यश निश्चित मिळते. न्यायाधीश आणि नागरिक यामध्ये असणारा दुरावा अशा महाशिबिराच्या माध्यमातून कमी होत असतो. अशा महाशिबिरांमध्ये न्यायदान प्रक्रियेत सक्रिय असणाऱ्या न्यायाधीशांना साध्या ड्रेसमध्ये येण्याच्या विनंतीला मान देत साध्या ड्रेसमध्ये आलेत त्यासाठी त्यांचे अभिनंदनही यावेळी श्री. किलोर यांनी केले.

# संजय गांधी निराधारचे लाभार्थी मानधनापासून वंचित

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** सालेकसा तालुक्यात संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेच्या माध्यमातून शेकडो लाभार्थ्यांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते. मात्र, गेल्या ७ ते ८ महिन्यांपासून लाभार्थ्यांचे बँक खात्यात मानधन जमा झाले नाही. यामुळे लाभार्थ्यांचे समोर जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

श्रावणबाळ निराधार योजनेतील वंचित व्यक्ती म्हणजे ६५ वर्षावरील वृद्ध, विधवा, अपंग, गंभीर आजारी व्यक्ती यानिराधार नागरिकांसाठी हे मानधन जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी अत्यन्त महत्त्वाचे असते. पण सात ते आठ महिन्यापासून वंचिताना मानधन मिळाले नसल्याने बँक आणि तहसीलदार कार्यालयाचे फेऱ्या मारण्यात त्यांचे कंबरडे मोडले आहे. सालेकसाचे तहसील कार्यालयातील संबंधिताना विचारणा केले असता ई-केवायसी झाली नसल्यामुळे मानधन जमा झाले नाही असे सांगण्यात आले. पण असंख्य लाभार्थी अजूनही लाभापासून वंचित आहेत. यामुळे लाभार्थ्यांना स्वतःची औषधे आणि दैनंदिन गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे शासनाने डीबीटी प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत जुनी ऑफलाइन पद्धत लागू करून थकीत मानधन त्वरीत द्यावे, अशी मागणी होत आहे.

# 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानांतर्गत येरंडी येथे जनजागृती

**निमगाव :** सार्वजनिक आरोग्य विभाग, गोंदिया अंतर्गत सध्या 'अरुणोदय' सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचे औचित्य साधून आज १७ जानेवारी रोजी, आरोग्य वर्धिनी केंद्र-येरंडी (प्राथमिक आरोग्य केंद्र, महागाव) यांच्या वतीने प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, येरंडी येथे सिकलसेल ॲनिमिया जनजागृती रॅली व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



सिकलसेल आजाराबद्दल समाजात पसरलेले गैरसमज दूर करणे आणि या आजाराचे वेळेवर निदान व उपचार व्हावेत, या उद्देशाने ही जनजागृती करण्यात आली. शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सहभागातून गावात रॅली काढण्यात आली. यावेळी फलक आणि घोषणांच्या माध्यमातून सिकलसेल निदानासाठी तपासणी करण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सिकलसेल आजाराची लक्षणे, घ्यावयाची काळजी आणि उपलब्ध उपचार पद्धती यावर सविस्तर प्रकाश टाकला. या मोहिमेत डॉ.ए.एस.मैंद, कु.एस. डी.मोटघरे, कु.डी. के.शहारे, सौ.के.एम.बोरकर आदि उपस्थित होते. सदर विशेष अभियान १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबवले जात आहे. 'तपासणी, निदान, उपचार, समुपदेशन व जनजागृती' हे या मोहिमेचे मुख्य सूत्र आहे. नागरिकांनी आपल्या रक्ताची तपासणी करून घ्यावी आणि या आजाराला रोखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य पथकाद्वारे करण्यात आले आहे.

# शिक्षण संस्था व मंचच्या वतीने नवनियुक्तांचा सत्कार



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** गोंदिया नगर पालिकेत पोवार समाजाचे तीन नगरसेवक निवडूण आले. त्यातच एकाची उपाध्यक्षपदी वर्णी लागली. त्या अनुषंगाने पोवार प्रगतीशील शिक्षण संस्था तसेच पोवार प्रगतीशील मंचच्या वतीने तिन्ही नगरसेवकांच्या घरी जावून सत्कार करण्यात आला. १५ जानेवारी रोजी गोंदिया नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी संतोष पटले यांची निवड झाली. तर मैथुला बिसेन या तिसऱ्यांदा निवडूण आल्या. तर शिशिर (गोलु) बिसेन यांनीही पहिल्यांदा नगर परिषदेच्या निवडणुकीत यश मिळविले. त्या अनुषंगाने हा सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याला मंचचे अध्यक्ष यु.टी.बिसेन, ॲड. टी. बी. कटरे, सचिन बंटी बोपचे, दिपम देशमुख, जलज येडे, राजकुमार पटले, भागचंद रहांगडाले, छनेश चौव्हान, सुरेश पटले, देवचंद बिसेन यासह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश भक्तवर्ती, उपाध्यक्ष शिशिर कटरे, कुर्मराज चव्हाण, प्रा. किशोर भगत, योगराज सोनेवाने, सौ. चेतना चव्हाण, सौ. सोनाली रहांगडाले, सौ. हिना चौधरी, छत्रपाल चौधरी, महेंद्र बिसेन आदी उपस्थित होते.

# सी.एस. प्रीमियर क्रिकेट लीगच्या दुसऱ्या सीजनला रायगड वॉरियर्स व सिंहगड स्ट्रायकर्स च्या रुपात मिळाले नवीन विजेते

## सी.एस. प्रीमियर क्रिकेट लीगचे पुढील तिसरे सिजन भव्य स्वरुपात आयोजीत केले जाईल : अनिलकुमार येरणे

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** स्थानिक देवरी येथील छत्रपती शिवाजी संकुल येथे शिक्षणमहर्षी झामसिंग येरणे यांच्या ७५व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त दिनांक १४ जानेवारी ते १७ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित सी.एस. प्रीमियर क्रिकेट लीगच्या पुरुषांच्या फायनल सामन्यामध्ये रायगड वॉरियर्स व महीलांच्या फायनल सामन्यामध्ये सिंहगड स्ट्रायकर्स संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.

'छत्रपती शिवाजी संकुलातील सर्व कर्मचाऱ्यांचे शारीरीक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे व त्यांच्यामध्ये खिलाडू वृत्ती, संघभावना विकसीत व्हावी तसेच मागील सिजनच्या यशस्वी आयोजनाची पुनरावृत्ती व्हावी म्हणून संकुलातील कर्मचाऱ्यांकरीता सलग दुसऱ्यादा या क्रिकेट सिजनचे आयोजन करण्यात आले होते विशेष बाब म्हणजे ही स्पर्धा छत्रपती शिवाजी संकुलातील महीला कर्मचाऱ्यांकरीता पहील्यांदा आयोजित केली गेली म्हणून याचे पुढील तिसरे सिजन आणखी भव्य स्वरुपात आयोजीत केले जाईल.' असे आश्वासन दिनांक १७ जानेवारी २०२६ रात्री पार पडलेल्या सी.एस. प्रीमियर क्रिकेट लीगच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सचिव अनिलकुमार येरणे यांनी काढले. याप्रसंगी मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष डॉ सुनीलकुमार येरणे व संस्थेच्या कोषाध्यक्षा जयश्री येरणे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या सी.एस. प्रीमियर क्रिकेट लीगच्या अतिशय रोमहर्षक ठरलेल्या सिंहगड स्ट्रायकर्स विरुद्ध शिवनेरी ब्लास्टर्स महीलांच्या



फायनल सामन्यामध्ये सिंहगड स्ट्रायकर्स संघाने सुपर ओवरमध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले त्यामध्ये कु. ज्योती राऊत मॅडम यांची सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. तसेच पुरुषांच्या अंतिम सामन्यात रायगड वॉरियर्स संघानी सिंहगड स्ट्रायकर्स विरुद्ध ८ धावा राखून या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले या फायनलमध्ये मुकेश तरोणे यांना ऑरेंज कॅप व गुणवंत काशिवार यांना पर्पल कॅप देऊन सन्मानीत करण्यात आले. या लीगमध्ये शिवनेरी ब्लास्टर्स, पुरंदर नाईट रायडर्स, रायगड वॉरियर्स, राजगड रॉयल्स व सिंहगड स्ट्रायकर्स या पाच संघानी आपली वर्णी लावली होती. या स्पर्धेकरिता यादोराव पंचमवार, उद्योगपती, देवरी व ?ड.भुषण मस्करे, देवरी यांचेकडून ?१०००० प्रथम पारितोषिक व संजूभाऊ ऊईके, नगराध्यक्ष, न. पं. देवरी यांचेकडून ?७००० द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. तसेच या स्पर्धेला यशस्वी बनविण्यात इंदरजीतसिंग भाटीया, गोंदिया जिल्हा महामंत्री (युवा मोर्चा -भाजपा), अंशुल अग्रवाल, संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, देवरी, पंकज शहारे, नगरसेवक, न. पं.देवरी, संकल्प प्रिंटींग प्रेस, देवरी, अशोका इलेक्ट्रॉनिक्स, देवरी, सनविंग्स कम्प्युटर्स, देवरी, किशोर किराणा स्टोर्स, देवरी, सोपाल हॉटेल, देवरी, जय हो इलेक्ट्रॉनिक्स, देवरी व एम.के. एंटरप्राइजेस, देवरी यांचे सहकार्य लाभले.

सी.एस. प्रीमियर क्रिकेट लीगच्या यशस्वीतेसाठी पंच म्हणून इमरान खान, डॉ पोकेश मुलतानी, माजीद खान यांचे सहकार्य लाभले. तसेच छत्रपती शिवाजी संकुलातील सर्व विभागाचे प्राचार्य यांनी संघाचे संघमालक होऊन व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी खेळाडू म्हणून सहभागी होऊन हे आयोजन यशस्वीरीत्या पार पडले.

# मुल्ला येथे डाक चौपालचे यशस्वी आयोजन



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**देवरी :** देवरी तालुक्यातील मुल्ला येथे काल शनिवारी (दि.१७) भारतीय टपाल खात्यामार्फत डाक चौपाल कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

मुल्ला येथील ग्राम पंचायतीच्या भवनात आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुल्लाच्या सरपंच कल्पना बागडे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या पोलिस पाटील ललिता भुते, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका पुष्पलता बागडे, डाक विभागाचे मेव ओव्हरसिअर जी एक कोसरकर, सीताराम मेंढे, गुणीदास वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मुल्लाच्या पोस्टमास्तर सीमा साळुंके यांनी केले. यावेळी बेसिक अकाऊंटचे १२ खाती उघडण्यात आली.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
सोमवार दि.१९ जानेवारी २०२६

## खा. प्रशांत पडोळे उतरले कबड्डीच्या मैदानात

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार प्रशांत पडोळे कबड्डीच्या मैदानात उतरले. भंडारा जिल्ह्यातील भिलेवाडा येथे जलसा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला निमित्त आयोजित कबड्डी स्पर्धेत काँग्रेसचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे उपस्थित झाले होते. या कार्यक्रमात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जलसा निमित्त आयोजित भव्य कबड्डी स्पर्धेत भंडारा-गोंदियाचे खासदार प्रशांत पडोळे यांना क्रीडा मंडळ यांच्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलवण्यात आले होते, उद्घाटनाच्या वेळी खासदारांना कबड्डीचा मोह आवरले नाही त्यांनी स्वतः मैदानात उतरून कबड्डीच्या आनंद घेतला आणि खेळाडूंच्या उत्साह वाढवला. खासदार प्रशांत पडोळे यांची ही खिलाडी वृत्ती पाहून उत्साह संचारला.



युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# मुजबी-जुना कारधा रस्ता चौपदरीकरण कामाची आमदार डॉ. परिणय फुके यांनी केली पाहणी



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** भंडारा शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या नॅशनल हायवे क्रमांक ६ अंतर्गत मुजबी ते जुना कारधा दरम्यान सुरु होणाऱ्या चौपदरीकरणाच्या कामाची आमदार डॉ. परिणय फुके यांनी आज प्रत्यक्ष स्थळावर जाऊन सखोल पाहणी केली. हा मार्ग भंडारा शहरातून जाणारा मुख्य वर्दळीचा रस्ता असून, या प्रकल्पामुळे शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, वेगवान व सुकर होणार आहे.

या पाहणीदरम्यान आमदार डॉ. परिणय फुके यांनी चौपदरीकरणाच्या संपूर्ण आराखड्याची माहिती घेतली. रस्त्याची एकूण रुंदी, दर्जेदार डांबरीकरण, साइड ड्रेनेज सिस्टीम, पावसाळ्यात पाणी साचू नये यासाठी योग्य निचरा व्यवस्था, सर्व्हिस रोडची रचना, सिग्नल यंत्रणा, पादचारी व दुचाकीस्वारांसाठी सुरक्षितता तसेच अपघातप्रवण ठिकाणी आवश्यक संरक्षक उपाययोजना यावर त्यांनी विशेष भर दिला.

> भंडारा शहराची वाढती लोकसंख्या व वाहतूक गरजा लक्षात घेता हा चौपदरीकरणाचा प्रकल्प अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत दर्जेदार आणि वेळेत काम पूर्ण करणे ही आमची प्राथमिकता आहे. या प्रकल्पामुळे भंडारा शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल.
> **आमदार डॉ. परिणय फुके**

काम सुरु करताना व्यापारी, नागरिक, शाळकरी मुले व रुग्णवाहिकांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी टप्प्याटप्प्याने काम करण्याचे तसेच पर्यायी मार्गांची योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यासोबतच, कामाचा दर्जा, पारदर्शकता आणि वेळेत पूर्तता याबाबत कोणतीही तडजोड होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या पाहणीप्रसंगी भंडाऱ्याचे पोलीस अधीक्षक नुरुल हसन, प्रोजेक्ट मॅनेजर अभिषेक यादव, रोड डिझाईन कन्सल्टंट अरविंद जैन, तसेच कॉन्ट्रॅक्टर बिष्णोई उपस्थित होते. त्यांनी प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी, कामाचे विविध टप्पे, वाहतूक व्यवस्थापन आराखडा आणि अपेक्षित कालमर्यादा याबाबत सविस्तर माहिती दिली.

सदर चौपदरीकरण प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ९ किलोमीटर असून, यासाठी अंदाजे ७९ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. हा प्रकल्प दिनांक २१ जानेवारी २०२६ पासून अधिकृतपणे सुरु होत असून, निश्चित कालावधीत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भंडारा शहरातील वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होईल, अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल तसेच शहराच्या औद्योगिक, व्यापारी व सामाजिक विकासाला मोठी चालना मिळेल.

या पाहणीप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष आशु गोंडाने, नगराध्यक्षा मधुराताई मदनकर, उपाध्यक्ष चंद्रकलाताई भोपे, ज्योती मोगरे, सचिन जी कुंभलकर, भगवान जी बावनकर, मुस्ताक उर्फ बल्ली पटेल, प्रशांत निंबोळकर, रुबीजी चड्डा, अक्षय भिवगडे, अजय ब्राम्हणकर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरु होणाऱ्या या चौपदरीकरणाच्या कामामुळे भंडारा शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून, नागरिक, व्यापारी वर्ग व वाहनचालकांकडून या प्रकल्पाबाबत समाधान व सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत



## वरठी ठाणेदाराच्या अन्यायाविरोधात माजी पोलीस पाटलाचे उपोषण सुरू

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** वरठी पोलीस स्टेशनचे ठाणेदार निलेश गिरी यांनी ग्राम पाहुणी येथील माजी पोलीस पाटील यांच्याविरोधात खोटा गुन्हा दाखल केल्याने माजी पोलीस पाटलाने न्याय मागणीसाठी भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

मोहाडी तालुक्यातील ग्राम पाहुणी येथील माजी पोलीस पाटील प्रतिम चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनानुसार वरठी पोलीस स्टेशनचे ठाणेदार निलेश गिरी यांनी पोलीस पाटील चव्हाण यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप श्री.चव्हाण यांनी केला आहे.

माझ्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याने समाजात चव्हाण यांची बदनामी झाली. पोलिसांनी पंच म्हणून बोलविले व गुन्हा का दाखल केला असे पाटील यांचे म्हणणे असुन पोलीस ठाणेदार वरठी यांची योग्य करून त्यांच्यावर करण्यात यावी या मागणीसाठी चव्हाण यांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

पिडीत चव्हाण यांची समस्या ऐकून घेण्यासाठी अ. भा. भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय मंचाचे विदर्भ अध्यक्ष सुरज परदेशी , महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी भेट देत पाटील यांच्या मागण्या योग्य असून प्रशासनाने त्यांना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## बन्सीलाल लाहोटी नूतन महाराष्ट्र विद्यालयाचे सुयश

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** नागपूर विभागीय शालेय टेनिकॉइट स्पर्धेत बन्सीलाल लाहोटी नूतन महाराष्ट्र विद्यालय भंडारा येथील १४ वर्षीय मुलांच्या चमूने नागपूर जिल्ह्याच्या चमूचा पराभव करीत विजेतेपद प्राप्त केले. व वाशिम येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ही चमू पात्र ठरलेली आहे. अंशुल मोहतुरे, पंकज शहारे, अंशुमन कावळे, खुशाल कोहाड, सोहम ठवकर ह्या विद्यार्थ्यांनी या खेळात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केलेले आहे.

टेनिकॉइट स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना शाळेतील क्रीडा शिक्षक प्रशांत घाटबांधे सरांचे विशेष मार्गदर्शन लाभलेले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष माननीय श्री. किशोरजी प्रधान सर, शाळेच्या माननीय सचिव सौ.शशिकलाताई प्रधान मॅडम, तसेच मा.जयंत प्रधान सर, शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री. तरोणे सर, पर्यवेक्षक मा. श्री साकुरे सर, तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक केले. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कैदी मृत्यू विषयी माहिती द्यावी

**भंडारा :** जिल्हा कारागृह, भंडारा येथील बंदी क्र. १००७/२५ रविशंकर सदानंद लिल्हारे (वय ५२ वर्षे) यांना दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.५० वाजता तातडीच्या उपचारासाठी सामान्य रुग्णालय, भंडारा येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक निर्वाण यांनी सदर बंद्यास सकाळी १०.२० वाजता मृत घोषित केले. ही माहिती कारागृह शिपाई श्री. गिरधारी बिसेन यांनी दूरध्वनीद्वारे जिल्हा कारागृह प्रशासनास कळविली.

या घटनेची दंडाधिकारीय चौकशी उपविभागीय दंडाधिकारी, भंडारा यांच्यामार्फत करण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी, भंडारा यांनी दिले आहेत. त्यानुसार सदर प्रकरणाची सुनावणी सुरू करण्यात येणार आहे.तरी या माध्यमातून जाहीर सूचित करण्यात येते की, मृतक कैद्याच्या मृत्यूबाबत प्रत्यक्ष माहिती असलेल्या व चौकशीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी सर्व संबंधित माहिती व सत्य परिस्थितीबाबतचे लेखी शपथपत्र सादर करावे. संबंधितांनी स्वतः सुनावणीस उपस्थित राहून उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भंडारा येथे दिनांक ३ जानेवारी २०२६ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत आपली माहिती सादर करावी, असे आवाहन उपविभागीय दंडाधिकारी, भंडारा यांनी केले आहे.

## सेंदूरवाफा येथे बिबट्याची दहशत



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** गेल्या पाच दिवसांपासून शहरातील प्रभाग क्र. १ व २ मध्ये जनतेनी बिबट्याला परीसरात मुक्त संचार करतांना बघीतले. शनिवार ता. १७ जानेवारीला नागरीकांना बिबट्या वाघाची पायांची ठसे आढळली आहेत. या परिसरात जनतेने सायंकाळी नंतर लहान मुलांना बाहेर निघण्यास मज्जाव केला आहे. तर या भागात बिबट्याची दहशत कायम आहे.

सेंदूरवाफा बिरसामुंडा चौक, शासकीय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालय परीसरात पाच दिवसांपासून बिबट्या वाघाला मुक्त संचार करतांना नागरीकांनी पाहीले. त्यांचे छायाचित्रण साकोली सोशल मिडीयावर चांगलेच व्हायरल झाले होते. याबाबत नगराध्यक्षा देवश्री कापगते, नगरसेविका वैशाली लांजेवार, शिवसेनेचे राधेश्याम मुंगमोडे, त्रिवेणी चौधरी, पुष्कर करंजेकर आणि जनतेने या भागात पाहणी केली. वनविभाग वन परिक्षेत्र अधिकारी सचिन कटरे, नगरपरिषद मुख्याधिकारी मंगेश वासेकर यांना निवेदन दिले. प्रशासनाने या भागात पाहणी सुद्धा केली आहे.

१५ जानेवारी व शनिवार १७ जानेवारीला सकाळी त्या भागात राहणारे रवि झोडे आणि निशिकांत गोबाडे यांच्या घराजवळ वाघांच्या पायांचे ठसे आढळली आहेत. त्यांनी यांची सर्व छायाचित्रे टिपली आहेत. तर या प्रभागात तेथील सामाजिक कार्यकर्ता सदस्य जनतेने सर्व लहान मुलांना सायंकाळी खेळण्यासाठी बाहेर निघण्यास मज्जाव केला आहे.

## राज्य क्रीडा दिन उत्साहात

**भंडारा :** जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ जानेवारी हा दिवस ऑलिंपीकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन "राज्य क्रीडा दिन" जिल्हा क्रीडा संकुल, भंडारा येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास रवींद्र सोनटक्के, शिक्षणाधिकारी (प्राथ) हे अध्यक्ष व प्रमुख अतिथी म्हणून शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त मोहन दाढी व योगेश्वर घाटबांधे हे उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमास सुनील कुरंजेकर (एकविध क्रीडा संघटना), तसेच राज्य युवा पुरस्कार्थी राजेश तलमले, लतिका लेकुरवाळे (जिल्हा क्रीडा अधिकारी, भंडारा), स्नेहल चौगुले (तालुका क्रीडा अधिकारी), भोजराज चौधरी (तालुका क्रीडा अधिकारी), उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रोहित वाघ यांनी केले, तर आभार प्रदर्शन क्रीडा अधिकारी श्री. निखिलेश तभाने यांनी केले.

## महानिर्यात इग्नाइट परिषदेचे यशस्वी आयोजन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा यांच्या पुढाकाराने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) निर्यातदारांसाठी महानिर्यात इग्नाइट परिषद २०२६ या राजस्तरीय एकदिवसीय परिषदेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात यशस्वीरीत्या करण्यात आले. या परिषदेचे उद्घाटन जिल्हाधिकारी सावन कुमार यांच्या शुभहस्ते झाले.



परिषदेत भारतीय टपाल विभागामार्फत एमएसएमई निर्यातदारांसाठी उपलब्ध असलेल्या डाक निर्यात केंद्र व डाक निर्यात सेवा योजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. अजय अडांगे, डाक निरीक्षक, तुमसर उपविभाग तसेच राजेंद्र लोथे, एम.ई. (भंडारा, नागपूर ग्रामीण) यांनी डाक निर्यात केंद्राची संकल्पना स्पष्ट करत टपालाधारित निर्यात सेवांचे महत्त्व विशद केले.

लघु व सूक्ष्म उद्योगांना अत्यल्प कागदपत्रांद्वारे, कमी खर्चात आणि सुरक्षित पद्धतीने आंतरराष्ट्रीय निर्यात कशी करता येईल, याबाबत प्रत्यक्ष उदाहरणांसह मार्गदर्शन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्ट / ईएमएसद्वारे सुलभ व पारदर्शक निर्यात प्रक्रिया, खासगी लॉजिस्टिक सेवांच्या तुलनेत किफायतशीर दर, पॅकिंगविषयक मार्गदर्शन, बुकिंग व ट्रॅकिंग सुविधा तसेच भारतीय टपाल विभागाचे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विस्तृत जाळे याची माहिती उपस्थित उद्योजकांना देण्यात आली.यावेळी अजय अडांगे, डाक निरीक्षक, तुमसर उपविभाग यांनी जिल्हा पातळीवर डाक निर्यात केंद्र व टपालाधारित निर्यात सेवा प्रभावीपणे राबविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

ही परिषद भंडारा जिल्ह्यातील एमएसएमई उद्योगांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी मार्गदर्शक ठरेल, तसेच निर्यातवृद्धीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## माळी समाजाचे स्नेहसंमेलन व गुणवंतांचा सत्कार

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**लाखनी :** येथील बळगे सेलिब्रेशन हॉल, केसलवाडा फाटा येथे माळी समाज समिती लाखनीच्या वतीने दिनांक १७ जानेवारी रोजी स्नेहसंमेलन, हळदीकुंकू व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.



सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक जतन आणि शैक्षणिक प्रगतीचा संदेश देणारा हा कार्यक्रम मोठ्या आनंदात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय माळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत भुसारी होते. प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ. सौ. विजयाताई नंदुरकर (नगरपरिषद पवनी), माजी सरपंच जयश्रीताई बारस्कर, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरदभाऊ इटवले, नवनिर्वाचित नगरसेवक नितीन गायधने, तसेच विविध ग्रामपंचायतींचे पदाधिकारी उपस्थित होते. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी तसेच सेवानिवृत्त मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात महिलांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित गीतांचे सादरीकरण केले, तर युट्युबस्टार प्रज्वल सावरकर यांनी समाजप्रबोधनात्मक नाट्य सादर केले. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. प्रास्ताविक अध्यक्ष गंगाधर भुसारी यांनी केले, संचालन कुमारी भाग्यश्री किरणापुरे यांनी तर आभार चंद्रशेखर भुसारी यांनी मानले. कार्यक्रमास परिसरातील विविध गावांतील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिंधुताई चिंधालोरे यांचे निधन

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी



**तुमसर :** सिंधुताई जयनारायण चिंधालोरे (सिंधुताई सहकारी पत संस्थाचे संस्थापक अध्यक्ष तुमसर ) यांचके आज १०.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पती व एक मुलगा असा आप्त परिवार आहे. यांनी आपल्या कारकिर्दीत सहकार क्षेत्रात चांगलाच ठसा उमटवीला आहे.

## लाखनी येथे तालुकास्तरीय तंत्रप्रदर्शनी

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**लाखनी :** बापूसाहेब लाखनीकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लाखनी येथे संस्थेच्या प्राचार्या प्रणाली दहाटे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय तंत्रप्रदर्शनी कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या प्रणाली दहाटे मॅडम उपस्थित होत्या.



तालुकास्तरीय तंत्रप्रदर्शनीचे निरीक्षक म्हणून समर्थ कनिष्ठ महाविद्यालय, लाखनी येथील एन. एन. कारवट, आर. आर. पटले व राजू भुरे यांनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कला, विज्ञान व तंत्रज्ञानाचे जनक विश्वकर्मा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पूजन करून करण्यात आली. यावेळी निरीक्षक आर. आर. पटले यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करताना तंत्रप्रदर्शनीचा उद्देश, प्रशिक्षणार्थ्यांमधील सृजनशीलता व नवकल्पनांचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या प्रणाली दहाटे यांनी 'तंत्र म्हणजे अवघड काम सोप्या पद्धतीने करण्याची कला असून आधुनिक काळात नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध लावणे अत्यंत आवश्यक आहे,' असे सांगितले. त्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या संशोधनाचे उदाहरण देत तंत्रज्ञानाचे समाजविकासातील महत्त्व अधोरेखित केले.

या तंत्रप्रदर्शनीत इलेक्ट्रिशियन, फिटर, मोटार मेकॅनिक व्हेईकल, आयसीटीएसएम, वेल्डर, फॅशन डिझाईन टेक्नॉलॉजी व कोपा या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण मॉडेल्स सादर करून आपली कौशल्ये प्रदर्शित केली. प्रशिक्षणार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निदेशक राजू भुरे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनाची जबाबदारी निदेशक चक्रधर पाखमोडे यांनी पार पाडली.

या तालुकास्तरीय तंत्रप्रदर्शनी कार्यक्रमात बापूसाहेब लाखनीकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लाखनी, गुरुकुल खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लाखनी, विश्वकर्मा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लाखनी तसेच धनंजय तिरपुडे खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लाखनी येथील प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निदेशक दिगंबर उरकुडे, शुभम व्यवहारे, शुभम सरकाटे, महेश शिंदे, मोहनजी रहाटे, नागेश बहिरे, हेमंत पिल्लेवान, नितेश सतदेवे, ईश्वरी भिवगडे, अर्चना जगाडे व सीमा सतदेवे यांनी विशेष सहकार्य केले.

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत सालई खुर्द शाळा प्रथम

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी :** मोहाडी पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद पालोरा येथे घेण्यात आलेला तीन दिवशीय तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सालई खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेची माध्यमिक मुलींची खो-खो स्पर्धेत २५ वर्षानंतर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून जिल्ह्यात स्थान मिळवून गावाचे नाव मोठे केले आहे. तसेच प्राथमिक मुलांनी खो-खो स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.



पहिल्यांदाच दमदार कामगिरी करीत विद्यार्थ्यांनी सुयश मिळविले आहे. शिक्षकांनी मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना घडविले आहे, शिक्षकांनी व गावकऱ्यांनी जिद्द निर्माण करून जिल्ह्यात क्रीडा स्पर्धेत गावाचे नाव मोठे केले आहे. सालई खुर्द शाळेची २५ वर्षानंतर जिल्ह्यात विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत खेळायला जाणार असल्याने कौतुक होत आहे. गावात मिळवणूक काढून मुलांचा उत्साह वाढविण्याच्या हेतूने सालई खुर्द येथे रॅली काढून त्यांचा सन्मान करण्यात आला.

या यशाबद्दल मुख्याध्यापक वाय. जी. भुरे, शिक्षक व्ही. बी. ठवकर, शिक्षकडी.एस.हाके, शिक्षक युनूस कुरेशी, शाळेचे अध्यक्ष लालचंद ठाकरे, सरपंच अनिता पटले, उपसरपंच बबलू सव्वालाखे, शाळा समितीचे सदस्य एमरीत ठाकरे, श्रीकांत बन्सोड, सुनील ठाकरे, गोपाल लिल्हारे, सामाजिक कार्यकर्ता भारत पटले, नितीन लिल्हारे, हरीश मांढरे, तुषार दमाहे, आशिष दमाहे, राकेश मेश्राम, संदीप पटले, राजेश दमाहे, छोटू ठाकरे, नंदलाल अटराहे, राजकुमार लिल्हारे, विनोद राणे, विवेक पटले, राजू अटराहे, महेश गराडे, शंकर गराडे, मोनू रहांगडाले, विशाल दडमल, मंनसाराम लिल्हारे, रणबीर लिल्हारे, राजेश कोहरे, महादेव लिल्हारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी विजयाचे श्रेय शाळेतील शिक्षक व गावकऱ्यांना दिले आहे.

## रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत चालकांमध्ये जनजागृती

**विशेष प्रतिनिधी**

**देसाईगंज दि.१९ :** नुकतेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गडचिरोली किरण मोरे व सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कार्यालयात उपस्थित मोटार वाहन निरीक्षक व सहा मोटार वाहन निरीक्षक यांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत चारचाकी वाहनाला आग लागल्यास करावयाच्या अग्निप्रतिरोधक विषयक सुरक्षा बद्दल माहिती योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी ट्रैकवर आलेल्या चालकाना देवून जनजागृती करण्यात आली.



तसेच मोटार वाहन निरीक्षक कमलेश खाड़े यांनी अग्नि प्रतिरा. धकचे प्रत्यक्षपणे प्रात्येक्षिक करवुन घेतले व प्रत्यक्षपणे अग्नि प्रतिरा. धक सोप्या पद्धतिनीनी कसे वापरायचे हे सोप्या रीतिने समजावूंन सांगीतले. योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणसाठी आलेल्या चालकाना वॉक ऑन राईट, सीट बेल्ट इत्यादी बद्दल सुध्दा समुपदेशन करण्यात आले. सर्व चालकांनीं उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गड़चिरोली यांचे आभार व्यक्त केले.

# टाटा मुंबई मैराथॉनमध्ये धावले गडचिरोलीचे युवक

## गडचिरोली पोलिस दलाच्या उपक्रमाअंतर्गत युवकांना मिळाली धावण्याची संधी

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**



**गडचिरोली दि.१९ :** गडचिरोली जिल्हा माओवाददृष्ट्या अतिसंवेदनशिल जिल्हा असून येथील दुर्गम-अतिदुर्गम भागात राहणाऱ्या युवकांना विविध खेळांमध्ये प्रोत्साहन देण्याकरीता व त्यांच्या क्रिडागुणांना वाव मिळण्याकरीता अनेक उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये कबड्डी, व्हॉलीबॉल व मॅरेथॉन यासारखे अनेक उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणून गडचिरोली पोलीस दल मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करीत असते. या मॅरेथॉन स्पर्धेच्या माध्यमातून युवक व युवतींनी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव उंचविता यावे या उद्देशाने, गडचिरोली जिल्हा पोलीस दलाच्या प्रोजेक्ट उडान अंतर्गत पोलीस अधीक्षक गडचिरोली नीलोत्पल यांच्या संकल्पनेतून व अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी. यांच्या मार्गदर्शनाखाली गडचिरोली जिल्ह्यातील १८ युवक-युवती व पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी आज दि.१८ जान. वारीला मुंबई येथे होत असलेल्या टाटा मॅरेथॉनमध्ये २१ कि.मी. (हाफ मॅरेथॉन) मॅरेथॉन करीता सहभाग नोंदविला.

मुंबई येथे दरवर्षी टाटा मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये राज्यातीलच नव्हे तर परद. शातील खेळाडू सुद्धा मोठ्या प्रमाणात सहभागी होत असतात. सदर मॅरेथॉन स्पर्धेकरीता गडचिरोली जिल्ह्यातील अतीदुर्गम भागातील युवकांना संधी देण्यासाठी ६८ पोस्टे, उपपोस्टे, पोमकें मधील युवकांची निवड चाचणी घेण्यात आली. त्यानंतर टाटा मुंबई मॅरेथॉनसाठी निवड करण्यात आलेल्या युवक युवतींना गडचिरोली पोलीस दलातर्फे मॅरेथॉनसाठी लागणारे सर्व साहीत्य (ट्रॅकसुट, शुज) वाटप करुन तज्ञ प्रशिक्षकांकडून योग्य सरावाचे मार्गदर्शन करण्यात आले.

टाटा मुंबई मॅरेथॉन स्पर्धेत गडचिरोलीचे युवक सहभागी झाले यासाठी पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक एम.रमेश, अपर पोलीस अधीक्षक अहेरी कार्तिक मधीरा, अपर पोलीस अधीक्षक गोकुल राज जी. यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व पोस्टे, उपपोस्टे, पोमकेंचे प्रभारी अधिकारी तसेच नागरी कृती शाखेचे प्रभारी अधिकारी पोउपनि. चंद्रकांत शेळके व अंमलदार तसेच प्रशिक्षक श्रेणी पोउपनि. जांगी यांनी अथक परिश्रम घेतले.

# खा.डॉ.नामदेव किरसान यांच्या मागणीला यश

## गडचिरोलीतील शेतकऱ्यांना आता तेलंगणातील रामागुंडम येथून युरिया पुरवठा

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**




**गडचिरोली दि.१९ :** गडचिरोली जिल्हा भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. मात्र दरवर्षी खरीप हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या युरिया रासायनिक खताच्या पुरवठ्यात मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. अपुरा साठा आणि विलंबित पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना युरियासाठी रांगा लावाव्या लागत होत्या व मोठ्या प्रमाणात हेळसांड सहन करावी लागत होती.

ही गंभीर समस्या लक्षात घेऊन गडचिरोली -चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी पावसाळी अधिवेशना दरम्यान संसदेत गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी तेलंगणा राज्यातील रामागुंडम येथून थेट युरिया खताचा पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी केली होती.

खा.डॉ.किरसान यांच्या या मागणीला यश आले असून, आता रामागुंडम (तेलंगणा) येथून थेट गडचिरोली जिल्ह्यात युरिया खताचा पुरवठा करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात युरिया उपलब्ध होणार असून शेती कामांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# धान खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करा - डॉ.होळी



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**

**चामोर्शी दि.१९ :** चामोर्शी तालुक्यातील धान खरेदी केंद्रांमधील गोदामे पूर्णपणे भरल्याचे कारण पुढे करून अनेक केंद्रे अचानक बंद करण्यात आल्याने हजारो धान उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. खरेदी केंद्रावर रांगा लावूनही धान विक्री न झाल्याने शेतकऱ्यांना आपले धान परत घेऊन जाण्याची वेळ येत असून, या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर व शेतकरीविरोधी परिस्थितीवर गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार डॉ.देवराव होळी यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवत प्रशासन व धान खरेदी केंद्रांच्या संचालकांना थेट इशारा दिला आहे.

तालुक्यातील शेतकरी दिलीप चलाख, साईनाथ बुरांडे, प्रसाद गुमफलवार, अनिल प्रिसिंगलवार, दिलीप नैताम, समीर मशीद, प्रभास सरकार, शुभास किर्तूनिया, आमिर सरदार, निखिल किर्तूनिया आदींनी डॉ.होळी यांच्या या आक्रमक भूमिकेला जाहीर पाठिंबा दर्शविला असून, धान खरेदी त्वरित सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. आता प्रशासन आणि खरेदी केंद्र संचालक शेतकऱ्यांच्या या आक्रोशाची दखल घेतात का, की परिस्थिती अधिक चिघळू देतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधले गेले आहे.

# विद्यार्थ्यांनी लावले खाऊचे स्टॉल

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**विशेष प्रतिनिधी**



**देसाईगंज दि.१९ :** पीएम श्री छत्रपती शिवाजी महाराज नगरपरिषद उच्च प्राथमिक शाळा, वडसा जुनी येथे येथे मकर संक्रांतीच्या शुभ औचित्याने दि.१७ जानेवारीला बाल आनंद मेळावा (फुड फेस्टिवल) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाव्यसचे सदस्य होमराज मुळे लाभले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून तालुका केंद्र समन्वयक जोशना दडमल उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटक तालुका समन्वयक दिनेश सातपुते तसेच समन्वयक ममता पिलारे, कल्पना सहारे यांची विशेष उपस्थिती लाभली.

मान्यवरांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याचे विधिवत उद्घाटन करून कार्यक्रमाची उत्साहात सुरुवात करण्यात आली. या मेळाव्यात जवळपास ५० विद्यार्थ्यांनी खाऊचे स्टहल लावले होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करून त्यांची विक्री केली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, व्यवहारज्ञान, संघभावना, आत्मविश्वास तसेच उद्योजकतेची आवड निर्माण झाली.

कार्यक्रमाचे संचलन शाळेचे मुख्याध्यापक किशोर चव्हाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवराम हाके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी, बाल मंत्रिमंडळ सदस्य, पालक वर्ग तसेच इतर सहकारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## झुडपांच्या विळख्यात अडकले हेमाडपंथी वैभव

**दै.युवाराष्ट्र दर्शन**

**गडचिरोली :** ऐतिहासीक वारसा आणि समृद्ध स्थापत्य कलेचे प्रतीक असलेले कसारी मार्गावरील घनदाट जंगलातील प्राचीन हेमाडपंथी मंदिर सध्या अस्तित्व टिकविण्यासाठी झगडत आहे.

शतकानुशकते ऊन, वारा, पाऊस झेलत उभे असलेले हे मंदिर आजही सुस्थितीत असले तरी शासन दरबारी याची साधी नोंदही नसल्याने गावकऱ्यांमधून संपात व्यक्त केला जात आहे. शेकडो वर्षापासून या मंदिराची डागडूजी, देखभाली दुर्लक्ष झाल्यानंतरही हे मंदिर शाबूत आहे. मात्र निसर्गाच्या प्रभावामुळे आणि वाढत्या झाडाझुडपांमुळे मंदिराच्या रचनेला तडे जाण्याची भीती निर्माण झाली आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

## मार्कंडादेव येथे भव्य अन्नदान सोहळा

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**



**चामोर्शी दि.१९ :** तालुक्यातील ऐतिहासिक व श्रद्धास्थान असलेल्या मार्कंडादेव येथील श्री क्षेत्र जय संतोषी माँ शक्तीपीठ संस्थानच्या वतीने मकरसंक्रांत पर्वानिमित्त धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने भव्य अन्नदान कार्यक्रम पार पडला असून परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

डॉ.रविंद्र सुरपाम व त्यांच्या पत्नी जयश्री सुरपाम यांच्या हस्ते विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. यावेळी अखंड ज्योत प्रज्वलित करण्यात आली असून संपूर्ण उत्सवकाळात ती अखंड तेवत ठेवण्यात आली होती.

या कार्यक्रमास शक्तीपीठ संस्थानच्या सचिव अल्का शेडमाके, उपाध्यक्ष रत्नादेवी गेडाम, कोषाध्यक्ष वर्षा भाजीपाले, सदस्य मंजुळा वेलादी, माजी सरपंच ललिता मरस्कोले, ग्रा.पं. सदस्य वर्षा सरपे यांच्यासह मारा. ति जुनघरे, वामन शेंडे, देवानंद सुरपाम, भगवान शेंडे, अमर मोगरे, राजू मोगरे, मुखरू राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच परिसरातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिकलसेल अभियानाचा शुभारंभ

**तालुका प्रतिनिधी**

**धानोरा दि.१८ :** राष्ट्रीय आरोग्य अभियान सिकलसेल आजार व नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत सिकलसेल अभियानाचे उद्घाटन सरपंच फालेश्वरी प्रदिप गेडाम यांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य केंद्र रांगीत करण्यात आले.

यावेळी प्रा.आ. केंद्राच्या सहायक अधिकारी डॉ.पूजा धुर्वे, आरोग्य सहायक एस.एन राजगडे, डी.के. वनकर, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी शैलेश जांभुळे, औषध निर्माण अधिक. री अंकित हेंमके, एल.बी.हिचामी, कोकडे, शितल सूर्यवंशी, अनिता चापडे, पेंदाम आशावर्कर आदि मान्यवर उपस्थित होते.

## प्रज्ञा संस्कार कॉन्व्हेंट मध्ये गोना मुनघाटे यांची जयंती



**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.१९ :** दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था व्दारा संचालित प्रज्ञा संस्कार कॉन्व्हेंट मध्ये दंडकारण्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गोविंदराव मुनघाटे यांची ९४ वी जयंती तसेच राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.


अध्यक्षस्थानी शाळेचे प्रशासक चेतन गोरे व मुख्याध्यापिका रिजवाना पठाण प्रमूख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी श्रध्देय गो.ना. मुनघाटे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून शैक्षणिक कार्याविषयी उपमुख्याध्यापिका नंदिनी भेंडारे यांनी माहीती दिली. पर्यवेक्षक आशिष ढोले यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल माहिती दिली. चेतन गोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका सपना पठाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक मुख्याध्यापिका जयश्री टप्पे, नंदिनी मोहूर्ले, विभाग प्रमुख आशिष ढोले, पर्यवेक्षिका श्रद्धा काचीनवार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## कुणबी समाजाची कार्यकारिणी गठीत

**दै.युवाराष्ट्र दर्शन चामोर्शी :** जगतगुरू तुकाराम महाराज कुणबी समाज बहुउद्देशीय संस्था चामोर्शी कार्यकारी मंडळाची नवीन कार्यकारिणी गंगाधरजी पाल यांच्या अध्यक्षतेत नुकतीच गठीत करण्यात आली. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून परशुराम सातार, सेवानिवृत्त गटविकास अधिकारी दिलीप चितारकर यांनी भूमिका पार पाडली. नवीन कार्यकारिणी अध्यक्ष म्हणून जनार्धन म्हशाखेत्री यांची निवड करण्यात आली.

## न.प.ने पाडली शाळेची जिर्ण इमारत



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि.१८ :** प्रभाग क्र.७ मधील रामपुरी शाळेची जुनी जिर्ण अवस्थेत असलेली ईमारत विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने धोकादायक होती. मागील वर्षभरापासून नगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा शाळेच्या वतीने करूनही दुर्लक्ष केले जात होते. याबद्दल शाळा प्रशासनाने नवनियुक्त नगरसेविका मेघा वरघंटीवार यांना माहिती दिली, त्यांनी त्याची त्वरीत दखल घेऊन शाळा निर्लेखीत करण्याची सूचना केली. त्याची दखल घेऊन न.प. प्रशासनाने जेसीबी पाठवून शाळेची जुनी इमारत पाडण्यात आली.

सदर कारवाई करतांना नगर परिषदेचे कर्मचारी, समाजसेवक रजनीकांत मोटघरे, मोहन वरघंटीवार आणि शाळा प्रशासनाचे कर्मचारी उपस्थित होते.

## वांगेपल्लीत ‘अरूणोदय’ अभियांना प्रतिसाद

**दै.युवाराष्ट्र दर्शन**

**अहेरी :** तालुक्यातील वांगेपली येथे व्हीएचएचएनडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने गावात सिकलस. ल ॲनिमिया (अरुणोदय) अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. सदर अभियान सरपंच दिलीप मडावी, वैद्यकीय अधिकारी डॉ. लुबना हकीम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या अभियानाचा मुख्य उद्देश सिकलसेल आजाराबाबत जनजागृती करणे व वेळेवर तपासणी करून रुग्णांना योग्य उपचार मिळवून देणे हा होता. यासाठी गावात रॅली काढण्यात येऊन नागरिकांना सिकलसेल आजाराची लक्षणे, प्रतिबंध व उपचार याबाबत माहिती देण्यात आली. रॅलीदरम्यान गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सरपंच दिलीप मडावी यांनी स्थानिक भाषेत मार्गदर्शन करत सिकलसेल आजाराबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. डॉ.लुबना हकीम यांनी सिकलसेल ॲनिमिया हा अनुवंशिक आजार असून वेळीच निदान व उपचार केल्यास रुग्णांचे जीवनमान सुधारू शकते, अशी सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

या अभियानात एमएमयु टीम, सीएचओ, आरोग्य सहाय्यक, एएनएम, आशा कार्यकर्ती व गट प्रवर्तक यांच्या सहकार्याने सिकलसेल पात्र लाभार्थ्यांची सोल्यूबिलिटी तपासणी करण्यात आली.

## स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची सभा संपन्न



**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**तालुका प्रतिनिधी**

**धानोरा दि.१९ :** येथे स्वस्त धान्य दुकानदार तालुका धानोरा संघटनेची सभा घेण्यात आली. या सभेमध्ये १२६ दुकानदार उपस्थित होते आणि संघटनेचे नवीन सदस्यांची निवड करण्यात आली.

सर्व दुकानदारांचा अनुमते सुनीता झंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली सभासदांची नियुक्ती करण्यात आली. तालुका अध्यक्ष जाकीर कुरेशी, तालुका उपाध्यक्ष सुनीता झंजाळ, तालुका सचिव माणिक गेडाम, तालुका सहसचिव अनिल दळांजे, कोषाध्यक्ष समीर कुरेशी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच सदस्य प्रेमीला गावडे, जास्वंदा वट्टी, शारदा दर्रो, प्रेमीला हिचामी, निराशा इंदूरकर, माणिक गेडाम, राजू निकोडे, मारोती गेडाम, रोशन शेडमाके यांची तालुका संघटनेचे सभासद मध्ये नियुक्ती करण्यात आली. ही कार्यकारणी पाच'वर्षासाठी घोषित करण्यात आली.

सर्व दुकानदारांनी संघटनेच्या वतीने आपले कर्तव्य आणि कार्य समजून शपथविधी घेण्यात आली. आज ची सभा धानोरा गार्डन मध्ये घेऊन सर्वानुमते पार पडली.

# इटियाडोह पाणी पुरवठा नियोजनेबाबत चर्चा

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**विशेष प्रतिनिधी**



**आरमोरी दि.१९ :** इटियाडोह प्रकल्पांतर्गत होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक प्रभावी, पारदर्शक व सर्वसामान्यांना दिलासा देणारे व्हावे, या उद्देशाने इटियाडोह प्रकल्प कार्यालय, आरमोरी येथे महत्त्वपूर्ण चर्चा बैठक पार पडली. सदर बैठकीचे अध्यक्षस्थान आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आ.मसराम यांनी भूषविले.

या बैठकीस इटियाडोह प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता तसेच प्रकल्पाशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीत पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती, भविष्यातील नियोजन, उन्हाळी हंगामातील पाण्याची मागणी तसेच सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या समन्वयावर सखोल चर्चा करण्यात आली.

आ.मसराम यांनी यावेळी बोलताना सांगितले की, इटियाडोह प्रकल्प हा आरमोरी व परिसरातील शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, पाणीवाटप करताना कोणत्याही गावावर अन्याय होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. शेतकऱ्यांना योग्य वेळी पाणी मिळावे, यासाठी नियोजनबद्ध वेळापत्रक तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीदरम्यान विविध अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठ्याशी संबंधित समस्या, अडचणी व सूचना मांडल्या. आ.मसराम यांनी सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत तातडीने योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

त्या प्रसंगी कार्यकारी अभियंता मोहूर्ले, उपअभियंता डहाणे, वडसा, उपअभियंता बनसोडे, अर्जुनी, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष आरमोरी मिलिंद खोब्रागडे, धनपाल मिसार, दिलीप घोडाम, नगरसेवक माणिक भोयर, नगरसेवक अक्षय बागडे, नगरसे. विका मेघा मने, मेघराज बुराडे, मनोज सपाटे संगीता मेश्राम, छगन हेडाऊ, चारुदत्त राऊत उपस्थित होते.

# वाचनाचा संकल्प हा अर्थपुर्ण बोधात्मक असावा - प्रा.दिलीप कहुरके

**दै.युवाराष्ट्र दर्शन**
**विशेष प्रतिनिधी**




**देसाईगंज दि.१९ :** स्थानीक अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, वडसा देसाईगंज येथे दि.१ ते १५ जानेवारी पर्यंत सुरू असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा - अभिनव उपक्रमा अंतर्गत सुरू असलेल्या सदर कार्रक्रम हा आमच्या महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ.डि.टी.गजभिये यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाला विशेष प्रमुख अतिथी बाबुराव मडावी महाविद्यालय, वडसाचे सेवानिवृत्त कर्मचारी व ज्येष्ट पत्रकार प्रा.दिलीप कहुरके आवर्जुन उपस्थित हाते.

दिलीप कहुरके यांनी आपल्या वक्तव्यात वाचनसंकल्प कसा करावा, वाचनाचे प्रकार, पद्धती, संस्कारामुळे वाचनाची आवड स्वत: मध्ये कशी निर्माण करावी, तसेच केवळ वाचन करून भागत नाही तर ते स्वअंगी अंगिकारले पाहिजे, क्रमिक पुस्तकांसोबतच अवांतर व दुर्मिळ ग्रंथाचा सुद्धा वाचन करायला हवे. म्हणजेच, त्यांना आपल्या वक्तव्यात सांगायचे होते कि, तांत्रीक साधनाद्वारे माहिती त्वरीत उपलब्ध होते. परंतु, अधिक काळ साठवुन राहु शकत नाही. त्या उलट पुस्तकातील वाचन हे डोक्यात करून विचारात व ज्ञानात भर पाडते. म्हणुनच सर्वांनी आजपासुन अर्थपुर्ण बोधात्मक वाचनाचा संकल्प केले पाहिजे. अशाप्रकारे कहुरके यांनी आमच्या विद्यार्थीवर्गाला अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाप्रसंगी ग्रंथालय व सांस्कृतीक विभागाद्वारे विविध स्पर्धा व उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ग्रंथालय परिसर स्वच्छता मोहीम, हिरकणी ग्रंथसाहित्य प्रदर्शनी, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा, हस्तलिखित निबंध स्पर्धा, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यात संवाद यांचा समावेश करण्यात आला. तसेच, विद्यार्थी हस्तलिखित शब्दफुले या पुस्तीकेचे पाहुण्यांचे हस्ते अनावरण करण्यात आले.

## एव्होनिथचे रनफॉर एन्व्हायर्नमेंटचे आयोजन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १८**

येथील स्व. वत्सलाबाई गोहाड कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राष्ट्रीय युवक सप्ताह कार्यक्रमामध्ये बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य चंद्रकांत ताथोडे तर मंचावर प्रा. दिनेश नागलिया प्रा. पोटे प्रा. बोहरुपी प्रा. डोईजड सुनील गोहाड शशिकांत वानखडे उपस्थित होते. प्रथम प्रतिमेचे पुजन व डॉ. दिपाली अढाऊ यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ. दिपाली अढाऊ यांनी मार्गदर्शन करताना भारत हा तरुणांनाचा देश असून युवा पिढी या देशाचे भविष्य आहे. आपण जीवनात विशिष्ट ध्येय बाळगून ते शक्य करण्यासाठी परिश्रम करणे गरजेचे आहे. डॉ. अढाऊ या कारगिल युद्धातील कॅप्टन कर्नल डॉ. राजेश अढाऊ यांच्या अर्धांगिनी असुन त्या सध्या बाईक ने संपूर्ण भारत भ्रमंती करत आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य चंद्रकांत ताथोडे यांनी केले.डॉ. अढाऊ या देशभक्तीचा वसा घेऊन देशातील विविध राज्यातील संस्कृती व परिस्थितीचा अभ्यास करित आहे. . कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा. उमेश पवार यांनी मानले.

## समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत न्याय व योजना पोहोचविण्याचा प्रयत्न - न्यायमूर्ती जोशी

### विधी सेवा महाशिबिर व योजनांचा महामेळावा




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १८**

पूर्वी ग्रामीण भागामध्ये कष्टाचे जीवन होते. आता गावांमध्ये सुख, सोई, सुविधा निर्माण झाल्या आहे. या सुविधांसोबतच न्याय व योजना प्रत्येक व्यक्तींपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. विधी सेवा महाशिबिर व योजनांच्या महामेळाव्यातून प्रत्येक नागरिकांपर्यंत न्याय व विविध योजनेचा लाभ मिळेल, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती तथा वर्धेच्या पालक न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी केले.

सेलू तालुक्यातील वडगाव रोडवरील किंग्स रिसोर्ट येथे आयोजित विधी सेवा महाशिबिर व योजनांचा महामेळाव्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड, पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीपती मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, विधी सेवा प्राधिकरणचे सचिव विवेक देशमुख, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष जयंत उपाध्याय, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे वरीष्ठ बालरोग तंज्ञ डॉ.संजय गाठे, सेलू तालुका वकील संघाचे अध्यक्ष शैलेश सातभाई आदी उपस्थित होते.

समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, दिव्यांगांना मोफत विधी सेवा पुरविणे हा विधी सेवा प्राधिकरण कायद्याचा उद्देश असून कायद्यानुसार समाजातील या घटकांना लोककल्याणकारी कायदे व योजना संदर्भात त्यांचे कायदेशिर हक्क, लाभ मिळवून देण्यासाठी मेळाव्यातून प्रयत्न करण्यात येत आहे. न्याय आणि विकास या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. आणि त्यासाठी महाशिबिर हे प्रेरणादायी माध्यम आहे. आजच्या या महाशिबिरातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा साधण्यास मदत होईल, असे न्या.हेमंत गायकवाड म्हणाले.

आपत्ती व संकटात सापडलेल्या नागरिकांना मदत करण्यासाठी पोलिस विभागाच्यावतीने ११२ टोल फ्री क्रमांक सुरु करण्यात आला. यावर मागील वर्षी २०१७ तक्रारी प्राप्त झाल्या. कुटूंबातील वाद प्रकरणाच्या तक्रारीसाठी भरोसा सेल सुरु करण्यात आला असून या सेलकडे १ हजार ८२५ प्रकरणे प्राप्त झाले आहे. यातील ८५ टक्के प्रकरणे आपसी समझोत्याने निकाली काढण्यात आली असल्याचे पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल म्हणाले.

जिल्हा प्रशासनामार्फत आयोजित करण्यात आलेल्या मागील सेवा पंधरवड्यात ३२ हजार लाभार्थ्यांना विविध सेवांचा लाभ देण्यात आला होता. राज्य शासनाच्यावतीने बळीराजा पांदन रस्ते योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील नागरिकांना होणार असल्याचे श्रीपती मोरे यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्याहस्ते सामाजिक न्याय विभाग, कृषि विभाग, महिला व बाल विकास विभाग, महसूल विभाग आदी विभागाच्यावतीने राबविण्यात आलेल्या योजनांच्या लाभाचे व प्रमाणपत्राचे मान्यवरांच्याहस्ते वितरण करण्यात आले. यावेळी विविध योजनेचे लावण्यात आलेल्या स्टॉलचे मान्यवराचे हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले व मान्यवरांनी स्टॉलची पाहणी केली.यावेळी अमोल भोसले, डॉ. संजय गाठे यांनी सुध्दा उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमातील उपस्थितांचे आभार विवेक देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला न्यायाधीश, अधिवक्ता, वकील, मोठ्या प्रमाणावर नागरीक व लाभार्थी उपस्थित होते.

## कृष्णागिरी देवस्थानचे सामाजिक कार्य उल्लेखनीय - अग्रवाल

### शिबिरात २०० पेक्षा अधिक रुग्णांची आरोग्य तपासणी व रक्तदान



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा ,दि. १८**

कृष्णागिरी देवस्थान ने अध्यात्मिक कार्य बरोबर सामाजिक कार्यात देखील तेवढे सक्रियतेने करतात. ब्लड डोनेशन कॅम्प व मोफत आरोग्य तपासणी शिबिर हे याचे उत्तम उदाहरण आहे.कृष्णागीरी देवस्थानचे सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मोहन अग्रवाल यांनी व्यक्त केले. श्री सद्गुरू परमहंस कृष्णागीरी महाराज देवस्थान धोत्रा रेल्वे , लायन्स क्लब गांधी सिटी वर्धा व वर्मा हॉस्पिटल द्वारा मोफत आरोग्य तपासणी शिबिर व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे यांच्या सहकार्याने ब्लड डोनेशन कॅम्प चे आयोजन करण्यात आले. दोनशे पेक्षा अधिक रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला तर अनेकांनी रक्तदान केले.या कार्यक्रमात लायन्स क्लब गांधी सिटी वर्धा चे संचालक संदीप चिचाटे, अनिल नरेडी,आशिष पोहाणे, महेश गुल्हाने ,अनिल गुल्हाने, डॉ.हनीफ शेख, नावेद शेख,डॉ आशिष वर्मा , डॉ. नेहा वर्मा, डॉ. ज्योती वर्मा , राहुल शर्मा, डॉ. धैर्य सपदिया,डॉ. शैली तिवारी, डॉ.उत्साह चक्रवर्ती, डॉ. पंकज सोनोने ,सामाजिक कार्यकर्ते तुषार तेवढे,मधुरि तडस ,संजिवनी पोहाने, स्मिता चिचाटे,प्रांजली गायकवाड, राहुल तेलरांधे, विक्रांत गव्हाणे ,विवेक शेंडगे , योगेश गावंडे,अश्विनी गुल्हाने, यांची प्रमुख उपस्थिती होती .शिबिर यशस्वी होण्याकरिता किशोर सुरकार, धनराज ढोरे, दत्ता त्रय कदम , गजानन वांढरे, हरीश पोटदुखे, सतीश गुल्हाणे ,यांनी परिश्रम घेतले.

## प्रियदर्शनी महाविद्यालयात क्रीडा दिन साजरा

**वर्धा, :** महान कुस्तीगीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिवसाचे औचित्य साधून येथील प्रियदर्शनी महिला महाविद्यालयात राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला, त्यानिमित्त क्रीडा विभागाच्या वतीने जिम्नॅस्टीक प्रशिक्षण केंद्रातील खेळाडू व त्यांच्या पालकांकरिता आहार व शारीरिक क्षमता या विषयावर प्रवीण बाळसराफ यांनी मार्गदर्शन केले, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा संघटनेचे सचिव राजेंद्र बाणमारे, व्हॉलीबॉल प्रशिक्षक अनिल श्रीवास्तव, प्रशिक्षक विक्रांत गव्हाणे, अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सोनाली सिरभाते उपस्थित होत्या, यावेळी जिम्नॅस्टिक प्रशिक्षक प्रणय वैद्य यांच्या नेतृत्वात खेळाडूंनी प्रात्याक्षिक सादर केली, संचालन प्रा. गुलशन चव्हाण यांनी केले, तर आभार प्रितेश रामटेके यांनी मानले.

## गर्दीचा फायदा घेत महिलेचे मंगळसूत्र हिसकावण्याचा प्रयत्न

**वर्धा :** शहरातील निर्मल बेकरी चौक परिसरात गर्दीचा फायदा घेत महिलेच्या गळयातील मंगळसूत्र हिसकावण्याचा प्रयत्न एका महिलेने केला, पण, महिलेने धाडस करुन चोरटया महिलेने धाडस करुन चोरटया महिलेस परिसरातील नागरिकांच्या मदतीने पकडून शहर पोलिसांच्या स्वाधीन केले, १६ जानेवारी रोजी ही घटना घडली.

फिर्यादी महिला ही बाजारपेठेत काही साहित्य खरेदी करीत होती, त्यावेळी एका महिलेने त्यांच्या गळयातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावले, मंगळसूत्र हिसकावून ती महिला पळ काढत असल्याचे लक्षात आल्यावर धाडक करीत परिसरातील नागरिकांच्या मदतीने चोरटया महिलेला पकडले, शहर पोलिसांना याची माहिती देण्यात आली, मंगळसूत्र हिसकावणाऱ्या महिलेला शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून तिच्यावर शहर पोलिसांनी तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला.

## श्री शनिदेव मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा, तेलाभिषेक व महाआरती



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा ,दि. १८**

स्थानिक श्री शनिदेव मंदिरात वार्षिक उत्सव' उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार २३ रोजी दिवसभर विविध आध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळी ९ वाजल्यापासून या मंगलमयी सोहळ्याला प्रारंभ होईल. उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'श्री शनिदेव भगवान का तेला अभिषेक' हा विधी असून, भाविकांना शनिदेवाच्या दर्शनासोबतच तेला अभिषेकाचा लाभ घेता येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६:३० वाजता'श्री शनिदेव श्रृंगार महाआरती'होईल. मनमोहक फुलांच्या सजावटीने आणि मंत्रोच्चाराने मंदिराचा परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे.रात्री ७:३० वाजता 'छप्पन भोग' अर्पण करण्यात येणार असून, त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. 'थाट-वाट से आवो शनिदेव को छप्पन भोग लगाओ' या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात सहभागी होऊन सहपरिवार प्रसादाचा लाभ घ्यावा, असे पंडित मुन्नालाल महाराज यांनी कळवले आहे.

## भगवानदास आहूजा प्रेरणादायी व्यक्तिमत्व - नगराध्यक्ष पांगुळ



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. १८**

सामाजिक कार्यात निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्यांची संख्या तशी ही नगण्यात असते. मात्र अशाही विपरीत परिस्थितीत समाजाविषयी असणारी तळमळ परोपकाराची भावना वागणुकीतले सौहार्द संवादातले मार्ग आपुलकी जिव्हाळा या सर्व गुणांनी युक्त आणि परिपूर्ण असणारे एखादे व्यक्तित्व जेव्हा आपल्याला आढळून येते तेव्हा त्याचा सत्कार व्हावा गुणगौरव व्हावा अशी भावना दृढ होते आणि याच भावनेने आज वर्धा शहरातील सुपरीचित व्यक्तित्व भगवानदास आहुजा यांचा गौरव माझ्या हस्ते व्हावा हा माझ्यासाठी एक भाग्यकारक योग आहे. अशी भावना नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी व्यक्त केली.

भगवानदास आहूजा यांची भोपाळ येथील सिंधी समाजाच्या आंतरराष्ट्रीय स्नेहमिलन कार्यक्रमात विश्वसिंधी सेवा संगमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. या अनुषंगाने नगर परिषदेमध्ये त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी खासदार सुरेश वाघमारे, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, राज्य कार्यकारनी सदस्य राजू लभाने, ब्राह्मण सभा वर्धेचे अध्यक्ष विलास कुलकर्णी, भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रशांत इंगळे तिगावकर, स्पोर्ट कराटे असोसिएशन वर्धा जिल्ह्याचे सचिव शिहान मंगेश भोंगाडे, समाजसेवी अभय तन्निरवार व आदींची प्रमुख उपस्थिती होती.भगवानदास आहुजा यांच्या नियुक्तीबद्दल नगरपरिषदेचे उपाध्यक्ष प्रदीप सिंग ठाकूर, डॉ. विनोद अदलखिया, डॉ. प्रदीप कश्यप, समाजसेवी मोहन अग्रवाल, पवन तिजारे,ॲड.विजयसिंह ठाकूर,ॲड. इब्राहिम बक्ष, ॲड. असद खान पटेल, एहसान राही, उमेश चौधरी, कन्हैयालाल चैनानी, महेश भाटिया आदी मान्यवरांनी आनंद व्यक्त केला.

## घोराडमध्ये संत केजाजीच्या पुण्यतिथीनिमित्त फुलणार भक्तीचा मळा

### समाधी मंदिरावर होणार अश्वाचे रिंगण, दिंडी पालखी सोहळा सोमवारी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १८**

विदर्भाची प्रतीपंढरी श्रीक्षेत्र घोराड येथे संत केजाजी महाराजांचे ११९ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित् सोमवारी १९ जानेवारीला दिंडी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून नामदेव महाराज समाधी मंदिराजवळ अश्वाचे रिंगण होणार आहे. येथे परिसरातील नव्हे तर विदर्भाचे कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी येत असल्याने घोराडमध्ये संत केजाजी महाराजांचे दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळणार आहे.

सोमवारी सकाळी १०.३० वाजता हरीनामाचा जयघोष करीत मंदिरातून संत केजाजी महाराजांची पालखी निघेल यात गावातील तसे



बाहेर गावातील २७५चे वर भजनी दिंड्यासोबत समोर बँडपथक, लेझीम पथक, आणि संत केजाजी महाराजांचे पादुका असलेला अश्व त्यामागे टाळ मृदगांचे तालावर नाचणारे वारकरी हरिनामाचा गजर करीत मंदिरातून निघालेली ही दिंडी बोरगंगेच्या तिरावरून मंदिरास प्रदक्षिणा घालून नामदेव महाराज समाधी स्थळावर पोहचल्यानंतर तिथे अश्वाचे रिंगण होईल. तिथे होणारे अश्वाचे रिंगण पाहता हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळते त्यानंतरही दिंड्या पताकासह पालखी गावातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत ग्रामपंचायतमार्गे दुपारी ४ वाजता पालखी मुख्य मंदिराजवळपास पोहचताच या सोहळ्याची सांगता केल्या जाते मोठ्या संख्येने भाविक यात सहभागी होत असल्याने ठिकठिकाणी अल्पोपोहार, चहापाण्याची व्यवस्था करण्यात येते पालखी गावातील प्रमुख मार्गाने जात असताना ठिकठिकाणी पालखीचे स्वागत होते पालखी मार्गावर रांगोळ्या काढून सजावट करण्यात येते ठिकठिकाणी उभारण्यात आलेले स्वागतद्वार रस्त्याची होणारी सजावट आणि टाळ मृदगांचे तालावर नाचणारे वारकरी पाहता गावात भक्तीचा मळा फुलल्याचे चित्र पाहायला मिळते

**'मंगळवारी दहिहांडी काला ,महाप्रसाद '**

मंगळवारी ता २० जानेवारीला दहिहांडी काला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून ३५ ते ४० हजार भाविकांना पंक्तीचे माध्यमातून येथे महाप्रसादाचे वितरण करण्यात येते मंगळवारी दुपारी १२ वाजता येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गोपाल काल्याचे किर्तन होईल त्यानंतर मंदिरातून निघालेली पालखी गोमाता मंदिरावर गेल्यानंतर तिथे दहीहंडीचा कार्यक्रम होईल त्यानंतर हजारो भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येते.

## निधन वार्ता

### सुरेश दुधनकर



**सिंदी (रेल्वे)** - शहरातील सराफा व्यापारी सुरेश नारायण दुधनकर (८५)यांचे निधन झाले. स्थानिक मोक्षधामात त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी असा आप्तपरिवार आहे.

### नत्थूजी लांबट



**वायगाव(नि.)** - येथिल रहिवासी नत्थूजी दादाजी लांबट (८०) यांचे दीर्घआज़राने भानखेड़ा येथे निधन झाले.त्यांनी अनेक वर्ष वर्तमानपत्र वितरणाचे काम केले. त्यांच्या पश्चात २ मूली,मुलगा,सुन आणि नातवंड असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर भानखेड़ा येथिल मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## बॉन्डटाइटने रणबीर कपूरसोबत ॲडहेसिव्हच्या भारतीय बाजारपेठेची पुनर्रचना करण्यासाठी घेतली धाडसी झेप

**नागपूर, १८ जानेवारी :** सुमारे ३० वर्षांहून अधिक कालावधीचा वारसा लाभलेल्या भारतातील सर्वात विश्वासार्ह ॲडहेसिव्ह (गोंद) ब्रँडपैकी एक असलेल्या ॲस्ट्रल लिमिटेडच्या बॉन्डटाइटने आपल्या नवीन ब्रँड मोहिमेच्या शुभारंभासह एक महत्त्वपूर्ण झेप घेतली आहेड्ढभारतीय गोंद बाजारात दर्जेदार ब्रँड म्हणून आपले स्थान अधिक दृढ करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक निर्णायक पाऊल आहे.

या धोरणात्मक पावलाचा एक भाग म्हणून, बॉन्डटाइटने सुप्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूर याची ब्रँड चेहरा म्हणून निवड केली आहे. विश्वासार्हता, अष्टपैलुत्व आणि पिढ्यानपिढ्या असलेले व्यापक आकर्षण यांसाठी ओळखला जाणारा रणबीर कपूर बॉन्डटाइटच्या ब्रँड मूल्यांशी सुसंगत असा चेहरा ठरतो आणि विश्वास व सापेक्षतेची ठोस भावना निर्माण करतो. ब्रँडसोबतच्या या हातमिळवणीमुळे सर्व प्रकारच्या चिकटविण्याच्या (ॲडहेसिव्ह) गरजांसाठी समानार्थी नाव बनण्याच्या बॉन्डटाइटच्या दृष्टीकोनाला नवे बळ मिळते.

कॅम्पेनच्या लॉन्चनंतर बोलताना, ॲस्ट्रल लिमिटेड (ॲडहेसिव्ह्ज अँड पेंट्स) चे सीईओ सौम्या इंजिनियर म्हणाले, ३ दशकांहून अधिक काळ बॉन्डटाइटने कामगिरी आणि सातत्य यांच्या जोरावर बाजारपेठेचा विश्वास संपादन केला आहे. एका सशक्त सेलिब्रिटी भागीदारीच्या पाठबळासह सादर करण्यात आलेले हे नवीन कॅम्पेन, विशेषतः पांढऱ्या गोंद (ॲडहेसिव्ह) विभागातील विकासाला गती देण्यासाठी आमचा नव्याने निर्माण झालेला उत्साह आणि आत्मविश्वास अधोरेखित करते. व्यावसायिक, कारागीर आणि ग्राहकांसाठी एक शक्तिशाली व विश्वासार्ह पर्याय ठरणारा राष्ट्रीय स्तरावरचा विश्वासू ब्रँड उभारून भारतीय ॲडहेसिव्ह बाजारपेठेचा विकास साधणे हा आमचा दृष्टिकोन आहे. संपूर्ण भारतभर आपली पाऊलखुणा वाढवत आणि नाते अधिक दृढ करत पुढे जाण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

ॲस्ट्रल लिमिटेडचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर कैरव इंजिनियर म्हणाले, लाकडाला चिकटवणारा गोंद हा ॲडहेसिव्ह श्रेणीचा कणा आहे आणि बॉन्डटाइट स्पष्टता व आत्मविश्वासाने या श्रेणीचे नेतृत्व करण्यास सज्ज आहे. बॉन्डटाइटला 'लाकडाचा चुंबक' (लकडी का चुंबक) म्हणून स्थान देत आम्ही सुतार, अर्जदार आणि व्यापार भागीदारांसाठी निवड अधिक सुलभ करत आहोत. रणबीर कपूरसोबतची भागीदारी सापेक्षता आणि विश्वास अधिक मजबूत करते, ज्यामुळे अत्यंत स्पर्धात्मक बाजारपेठेत विश्वासार्ह, उच्च-कार्यक्षमतेचप्पर्याय उभारताना व्यापार परिसंस्थेतील आमचे संबंध अधिक दृढ होतात.

## रियलमी ने रियलमी १६ प्रो सिरीजचे केले अनावरण



**नागपूर, १८ जानेवारी :** भारतीय युवकांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमीने आज अत्यंत प्रतीक्षित रियलमी १६ प्रो सिरीजचे अनावरण केले. यामुळे या सिरीजची प्रीमियम मिड-रेंज सेगमेंटमध्ये बेंचमार्क म्हणून असलेली स्थिती अधिक भक्कम झाली आहे. फ्लॅगशिप-टियररियलमी १६प्रो प्लस आणि ॲलक्सेसिबल ऑल-राउंडर रियलमी १६ प्रो यांच्या नेतृत्वाखाली ही सिरीज परफॉर्मन्स आणि डिझाइनमध्ये उत्कृष्टतेचा दर्जा वाढवत असून पोर्ट्रेट इमेजिंगच्या स्टॅन्डर्ड्सना नव्याने परिभाषित करण्यावर अभूतपूर्व लक्ष केंद्रित करते.

रियलमी १६ प्लस प्रो+मध्ये इंडस्ट्रीतील पहिले बायो-बेस्ड ऑरगॅनिक सिलिकॉन बॅक कव्हर देण्यात आले आहे, हे एक युएसडीए-सर्टिफाइड इको-फ्रेंडलीटेरियल असून ते सॉफ्ट आणि रेसिलियंट टेक्स्चर ऑफर करते. त्याचा रिफाइन्ड व्हीट-ग्रेमॅटर्न बोटांना गव्हाच्या शेतातून फिरवल्यासारखी अनुभूती देतो. सोबतच, त्याची ऑल-नेचक्कर्व्ह डिझाईन ही बॅक पॅनलपासून डिस्प्लेपर्यंत सीमलेस आणि कम्फर्टेबल ग्रिप सुनिश्चित करते. रंगांचे पर्यायही तितकेच वेगवेगळे आहेत. रियलमी १६ प्रो प्लस हा मास्टर-क्युरेटेड्मास्टर गोल्ड, मास्टर ग्रे आणि कॅमेलिया पिंक हा एक फ्रेश शेड फक्त भारतात उपलब्ध आहे. २०० एमपी लुमा कलर पोर्ट्रेट कॅमेरा, ३.५ एक्स पेरिस्कोप टेलिफोटो लेन्स, स्नॅपड्रॅगन ७ जेन ४ चिपसेट, ७००० एमएएच टायटन बॅटरी आणि अर्बन वाइल्ड डिझाइन असलेला रियलमी १६ प्रो प्लस हा नाओतो फुकासावा यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. हा फोन ८ जीबी + १२८ जीबी, ८ जीबी + २५६ जीबी आणि १२ जीबी + २५६ जीबी या व्हेरिएंट्समध्ये उपलब्ध असून त्याची किंमत ३५,९९९*पासून सुरू होते.

## सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेत रजत वर्माचा नवा लुक 'मोहब्बतें'च्या शाहरुख खानसारखा आहे



**नागपूर, १८ जानेवारी :** वेधक कथानकामुळे सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिका लोकप्रिय झाली आहे. या मालिकेत विराटची भूमिका करणाऱ्या रजत वर्माने अलीकडेच आपल्या लुकमध्ये लक्षणीय बदल घडवून आणला आहे, ज्यामुळे पडद्यावरील त्याच्या व्यक्तिरेखेला एक नवा कोरा आयाम मिळाला आहे. मालिकेत सुरुवातीला साध्या कॅज्यूअल्समध्ये बिनधास्त वाटणारा विराट आता नव्या लुकमध्ये अधिक परिपक्व आणि मर्दानी दिसत आहे.

विराटची व्यक्तिरेखा अनुभव आणि जबाबदाऱ्यांमधून तावून सुलाखून प्रगल्भ झाली आहे. आता विराटचे स्टाइलिंग देखील बदलले आहे. क्लीन कट, सौम्य स्वर आणि नीटनेटके कपडे यामधून त्याच्यातील परिपक्वता स्पष्ट होते. गंमत म्हणजे, विराटच्या या लुकची प्रेरणा शाहरुख खानच्या 'मोहब्बतें' मधल्या लुकवरून मिळाली आहे. विराटचे बदललेले व्यक्तिमत्व दाखवण्यासाठी स्टाइलिंग टीमने डठघ ची या चित्रपटातील सौम्य शालीनता, मिनिमल तरीही प्रभावी, शांत पण आत्मविश्वासपूर्ण लुक विराटला देण्याचा प्रयत्न केला आहे. सौम्य कापडापासून ते फिकट रंगांच्या कपड्यांपर्यंत प्रत्येक स्टाइलिंगमधून विराट सध्या ज्या टप्प्यातून जात आहे, त्याची कल्पना येते. तो सध्या गंभीर जबाबदारी सांभाळत आहे आणि कठीण परिस्थितीला तोंड देत आहे. त्याच्या तारुण्य-सुलभ्लुक बदलून आता तो अधिक शांत आणि स्थिर दिसू लागला आहे. यामधून दिसते की विराटचा भावनिक विकास कसा झाला आहे आणि तो किती परिपक्व झाला आहे. या नवीन लुकविषयी बोलताना रजत वर्मा म्हणतो, मी जेव्हा सुरुवातीला विराटची भूमिका करू लागलो, तेव्हा त्याच्या कपड्यांमधून हा अंदाज येत असे की, त्यावेळी तो कशा स्वभावाचा तरुण असेल- स्वच्छंद, काहीसा उतावळा आणि त्या क्षणात जगणारा. जसजशी ही व्यक्तिरेखा मोठी होत गेली आणि कथानक पुढे सरकले, त्यांचे स्टाइलिंगही स्वाभाविकपणे त्याच्या स्वभावानुसार अधिक सफाईदार आणि परिपक्व झाले आहे.

टीमने जेव्हा या परिवर्तनाविषयी चर्चा केली, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर पहिल्यांदा आला तो 'मोहब्बतें'मधला शाहरुख खानचा लुक. या नवीन स्टाइलिंगमुळे लुकमध्ये एक विशिष्ट गांभीर्य आले. या लुकमुळे मला विराटची ही बदललेली, अधिक प्रगल्भ बाजू दाखवायला मदत झाली. त्याच्या या स्वभावाचा शोध घेताना मला आनंद मिळाला. आणि मला वाटते की, प्रेक्षकांनाही विराटमधले हे परिवर्तन जाणवेल.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे महानगर पालिका निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक विजयाचे धुरंधर शिल्पकार

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १८ :**



महापालिका निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित महाराष्ट्राच्या प्रचाराला राज्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे पाठिंबा व्यक्त केल्याचे चित्र निकालांमुळे स्पष्ट झाले आणि त्याच बरोबर शहरी मतदाराची अचूक नस माहिती असलेल्या भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या विचारधारेसोबत राहण्याच्या आवाहनाला मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे निकालांवरून दिसले. मागील वर्षी जानेवारीत रविंद्र चव्हाण यांनी भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर राज्यात दीड कोटी प्राथमिक सदस्यांचा टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले होते तिथेच ते अर्धी लढाई जिंकल्याचे आज या दणदणीत विजयाने स्पष्ट झाले.

भाजपा हा धोरण आखणारा आणि धोरण राबविणारा पक्ष आहे. निवडणुकांचे नियोजन, तिकीट वाटप, सभांचे नियोजन याबरोबरच विरोधी पक्षांना जोखण्याचे कसब ड्ढदेवेंद्र आणि रविंद्रड्ढ या भाजपाच्या जोडीकडे आहे. सरकार आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश पक्ष यातील समन्वयाचे हे यश असल्याने हा अभूतपूर्व विजय मिळाल्याचे विश्लेषण राजकीय पंडितांनी केले आहे. महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे शीर्षस्थ नेतृत्त्व म्हणून पक्षासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी रविंद्र चव्हाण यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात बोलून दाखवलेली. त्यांच्या रूपाने भाजपाला रस्त्यावर उतरून आंदोलन केलेला आणि मातीशी जोडलेला कार्यकर्ता अध्यक्ष म्हणून मिळाला. निवडणूक काळातील वक्तव्याने, पेहरावाने झालेल्या वैयक्तिक स्वरूपाच्या टीकेमुळे रविंद्र चव्हाण बिलकुल विचलित झाले नाहीत. उलट त्यांनी विरोधकांना जनतेसाठी अनावश्यक अशा विषयात गुंतवून ठेवून, भाजपासाठी विजयाची वाट अधिक सुकर केल्याचे स्पष्ट झाले. विरोधकांनी चव्हाण यांच्यावर केलेल्या वैयक्तिक टीकेला जनतेच्या दृष्टीने कवडीमोल किंमत असल्याचेही या निमित्ताने दिसले. २५ वर्षांच्या राजकीय वाटचालीत रविंद्र चव्हाण त्यांच्यावर झालेल्या प्रत्येक टीकेनंतर एक पाऊल पुढे जातानाच दिसले. याचे कारणच कायम संघर्ष करून यश संपादन केलेला रविंद्र चव्हाण यांच्यासारखा नेता महाराष्ट्रातील जनतेने अजून नीटसा पाहिलेला वा ओळखलेला नाही आणि राजकीय निरीक्षकांनी अजून अभ्यासलेला नाही. रविंद्र चव्हाण हे अत्यंत मुरलेले आणि मुरब्बी राजकारणी म्हणून महाराष्ट्रात आजच्या भाजपाच्या विजयाने उदयास आलेले आहेत हे दिसले.

देवेंद्र फडणवीस यांना रविंद्र चव्हाण यांची बलस्थानं माहिती आहेत. पक्षासाठी २४ तास समर्पित अध्यक्ष म्हणून त्यांचे महत्त्व फडणवीस जाणून आहेत. रविंद्र चव्हाण यांचा शहरी महाराष्ट्राच्या राजकारणाचा अनुभव आणि त्यांची कायम 'निवडणूक सिद्धता ' म्हणजेच इलेक्शन रेडीनेस अशा स्वरूपाची कार्यशैली देवेंद्र फडणवीस ओळखून आहेत. त्यातच अडीच वर्षे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम करताना अवघा महाराष्ट्र पिंजून काढत रविंद्र चव्हाण यांनी खात्याच्या माध्यमातून विकासकामे करताना संपूर्ण महाराष्ट्रात हेरलेली आणि पेरलेली माणसं ही भाजपासाठी महत्त्वाची ठरली असं दिसत आहे.

## चेक बाऊंस प्रकरणात सीए दोषी

**नागपूर, दि. १८ :**

जिल्हा आणि सत्र न्यायालयाने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) अविनाश सगदेव यांना ४५ लाख रुपयांच्या चेक बाउन्स प्रकरणात दोषी ठरवत एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने त्यांना ६० लाख रुपयांपेक्षा जास्त भरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी महेश फडे यांनी हा निकाल दिला. या प्रकरणात २०२२ मध्ये तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारदार अमर कटारिया यांच्या तक्रारीनुसार, ते २०१७ मध्ये आरोपी सगदेव यांना एका गुंतवणुकीबाबत भेटले होते. सगदेव आणि त्यांच्या कुटुंबाने असा दावा केला होता की त्यांना मौजा कान्होली येथील शेतीची जमीन निवासी लेआउटमध्ये रूपांतरित करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. कटारिया यांनी १५ लाख रुपयांची गुंतवणूक केली, ज्यामध्ये त्यांच्या पत्नीने त्यांच्या मुलाच्या उच्च शिक्षणासाठी साठवलेल्या पैशांचाही समावेश होता.

## लाच घेताना एचपीसीएलचा अधिकारी जाळ्यात

### १ लाख रुपये घेताना सीबीआयने रंगेहात पकडले

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १८ :**

केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय)च्या नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) च्या विक्री अधिकाऱ्याला १ लाख रुपयांची लाच मागून त्याचा स्वीकार करताना रंगेहाथ अटक केली. आरोपीवर रिटेल आऊटलेट देण्याच्या बदल्यात लाच मागितल्याचा आरोप आहे. प्रतीक तागडे असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. सीबीआयने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. प्रतीक हा चंद्रपूरमधील एचपीसीएलचा विक्री अधिकारी आहे. १२ जानेवारी रोजी तक्रारदाराने सीबीआयकडे लाच मागितल्याचा आरोप करत लेखी तक्रार दाखल केली. तक्रारदाराची पत्नी एचपीसीएल रिटेल आउटलेटची संचालिका आहे आणि प्रतीकवर रिटेल आउटलेट वाटप करण्याची जबाबदारी होती. प्रतिकने आउटलेट वाटप करण्यासाठी २ लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारीनंतर, सीबीआयने १३ जानेवारी रोजी पडताळणी केली, ज्यामध्ये आरोपीने लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तागडेला पकडण्यासाठी सापळा रचण्यात आला. त्याला काम पूर्ण झाल्यावरही २ लाख रुपये पाहिजे होते.

तक्रारदाराने जेव्हा स्पष्ट केले की तो एकरकमी रक्कम देऊ शकत नाही, तेव्हा तागडे १ लाख रुपयांची अंशतः रक्कम स्वीकारण्यास तयार झाला. त्यानंतर सीबीआय नागपूरने शनिवारी सापळा रचला. आरोपीला चंद्रपूरमध्ये तक्रारदाराकडून १ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.

## अखेर बोमा अडकला पोलिसांच्या जाळ्यात

**नागपूर, दि. १८ :** शनिवारी संध्याकाळी पोलिसांनी कुख्यात गुन्हेगार आणि बुकी आशिष कुबडे उर्फ बोमा याला अटक केली. एका व्यावसायिकाकडून २० लाख रुपये खंडणी आणि एका महिला बार कलाकाराचा विनयभंग केल्याच्या प्रकरणात बोमा फरार होता. गुन्हा दाखल होताच बोमा शहरातून पळून गेला. सदर आणि एमआयडीसी पोलिस तसेच गुन्हे शाखा त्याचा शोध घेत होती, परंतु तो सापडत नव्हता. शनिवारी संध्याकाळी डीसीपी झोन ३ राहुल मदने यांच्या पथकाला माहिती मिळाली की बोमा गंजीपेठ परिसरात एका नातेवाईकाला भेटायला आला आहे. माहिती मिळताच पथकाने परिसरात सापळा रचला. बोमा त्याच्या नातेवाईकाच्या घरातून निघताच पोलिसांनी त्याला अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी त्याला सदर पोलिसांच्या ताब्यात दिले.

# न.पं.निलडोहच्या उपाध्यक्षपदी प्रविश भाभडा न.प. वानाडोगरीच्या उपाध्यक्षपदी चंदा अजमीरे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. १८ :**



तालुक्यातील नगर पंचायत निलडोहच्या उपाध्यक्षपदी प्रविश भाभडा यांची बिनविरोध निवड झाली तर नगर परिषद वानाडोंगरीच्या उपाध्यक्षपदी चंदा अजमीरे यांची एकमताने निवड झाली. निलडोह मध्ये मनोनीत नगर सेवक पदी भाजपाचे मंगेश हरणे व कॉंग्रेसचे रत्नसेन डहाट यांची वर्णी लागली असुन यांच्या नावांची घोषणा नगराध्यक्ष भुमिका मंडपे यांनी केली तर नगर परिषद वानाडोंगरीच्या भाजपाचे मनोनीत नगर सेवक कमलेश सिंग ठाकूर, राजा तिवारी व सचिन मेटजोगे यांच्या नावांची घोषणा नगराध्यक्ष सुनंदा बागडे यांनी केली.

आमदार समीर मेघे यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा नगर सेवकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या वेळी न.पं.न.पं. निलडोहच्या उपाध्यक्षपदी प्रविश भाभडा तर न.प. वानाडोगरीच्या उपाध्यक्षपदी चंदा अजमीरे. या वेळी नगर पंचायत निलडोहचे मुख्याधिकारी योगीता डांगरे व न.प. वानाडोगरीचे मुख्याधिकारी परिहार यांनी शासकीय कामगिरी चोख पार पाडली.

## रक्तबंबाळ मिळालेल्या तरुणाचा मृत्यू

**नागपूर, दि. १८ :**

सतरंजीपुरा परिसरात शुक्रवारी सकाळी रक्तबंबाळ मिळालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. विविध तर्कवितर्कांना उधाण आले असून, पोलिसांनी सर्व बाजूंनी तपास सुरू केला आहे. शुक्रवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास सतरंजीपुरा परिसरातील आदिल हारून नागानी यांच्या घरासमोर एक तरुण गंभीर जखमी अवस्थेत पडलेला असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी युवकाला उपचारासाठी रुग्णालयात हलवले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृतकाची ओळख मध्यप्रदेशातील रहिवासी मोहन बैगा अशी झाली आहे. पोलिसांच्या तपासात त्याच्या खिशात आधार कार्ड तसेच बिलासपूर ते नागपूर असा रेल्वे प्रवासाचा तिकीट आढळून आला आहे. त्यामुळे तो अवघ्या एक दिवसापूर्वीच नागपूरला आला असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार, युवक चोरीच्या उद्देशाने एखाद्या घरात शिरला असावा. त्यावेळी पळून जाताना तो उंचावरून पडला आणि गंभीर जखमी झाला असावा.

## हरित सेनेची पर्यावरण जागृती कार्यशाळा : प्लास्टिकमुक्तीचा संदेश




**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**वाडी, दि. १८ :**

वडधामना येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलमध्ये सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, हिंगणा यांच्या वतीने शाळेतील हरित सेनेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन शनिवार १७ जानेवारी रोजी सकाळी उत्साहात पार पडले.या कार्यशाळेत क्षेत्रीय वनाधिकारी पी. एल. साठवणे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देत प्लास्टिकचा वापर टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे, कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्लास्टिकमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यांची उदाहरणांसह माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले.कार्यशाळे शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर डायगव्हाणे, ज्येष्ठ शिक्षक गजानन तलमले, शिक्षिका लता सूर्यवंशी, शिक्षकेत्तर कर्मचारी दिलीप खेकारे, नंदू जयपूरकर, अरुण कुबडे, वकील पठाण, राजकुमार पराची उपस्थित होते. सामाजिक वनीकरण विभागाकडून दिक्षा आटोर (वनरक्षक) व एन. एम. नगरारे (वनपाल) यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक प्रश्न विचारून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ही प्रत्येकाची असून लहान कृतीतून मोठा बदल घडू शकतो, असा प्रभावी संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होऊन हरित सेनेचे कार्य अधिक प्रभावी होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. उपस्थितांचे आभार मानून कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

## 'दुःख' एक यातना नाटकाचे सादरीकरण



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, कुही, दि. १८ :** नित्यनेमाने यावर्षीही चंद्रशेखर आझाद क्रीडा, सांस्कृतिक मंडळ व सीए ग्रुप च्या संयुक्त विद्यमाने संगीत 'दुःख' एक यातना या तीन अंकी नाटकाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे दरवर्षी या मंडळातर्फे मोफत निशुल्क नाटकाचे सादरीकरण केले जाते. करिता त्यांचे सर्व स्तरातून प्रशंसा केली जात आहे. झाडीपट्टी रंगभूमी वडसा निर्मित, निर्माता, दिग्दर्शक व कलावंत शेखर पटले यांच्या व नाटकातील संपूर्ण कलावंतांनी केलेल्या रंगतदार अभिनय व हृदयस्पर्शी प्रसंगाने प्रेक्षकांना खीळवून ठेवले. व उत्कृष्ट दादही मिळवली. उद्घाटन कार्यक्रमाला ग्रामीण भाजपा अध्यक्ष आनंद राऊत, राकाँ. डॉक्टर सेल जिल्हाधक्ष डॉ. रवी शेंडवरे, युवक जिल्हाध्यक्ष चेतन खडसे, प्राचार्य गजानन मांडेकर, युवा सामाजिक कार्यकर्ता निलेश दंडारे, प्रमोद घरडे, काँग्रेस शहराध्यक्ष देविदास ठवकर, माजी नगराध्यक्ष सुरेश येळणे, नगरसेवक निखिल येळणे, विनोद हरडे, नरेंद्र झुरमुरे, पत्रकार गजानन लांजेवार, ईश्वर धनजोडे, सौरभ दंडारे, रामकृष्ण डहाके, प्रकाश पडोळे, दिनेश लांजेवार, चंद्रभान जंजाळ, सुधीर भगत, रामभाऊ क्षीरसागर, संकेत खतवार, दुर्गेश हजारे, स्वप्निल लेंडे, रामा चाचेरकर व इतर मान्यवर उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते नाटकाचे विधिवत उद्घाटन पार पडले. प्रसंगी समयोचित मनोगत व्यक्त करण्यात आले. दुःख एक यातना' हे झाडीबोली रंगभूमीवरील एक गाजलेले नाटक आहे, जे प्रेमकुमार मलोडे यांनी लिहिले आहे. हे नाटक दुःख, संघर्ष आणि मानवी भावनांच्या खोलवरच्या वेदनांचे चित्रण करते, मानवी जीवनातील दुःख, त्याग आणि यातना, विशेषतः एका कष्टकरी तरुणाची जीवनातील संघर्षातून हे मांडले जाते. या नाटकाचे कथानक, पात्रे आणि विशेषतः झाडीबोलीतील संवाद व विनोदी प्रसंगाने प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले.

## लेखिका ममता कालिया आणि मणिपुरी लेखिका अरामबम ओंगबी मेमचौबी यांना 'आकाशदीप' पुरस्काराने सन्मानित



**नवी दिल्ली, १८ जानेवारी :** साहित्य क्षेत्रातील त्यांच्या सर्वांगीण योगदानाबद्दल, २०२५ चा अमर उजालाचा सर्वोच्च शब्द सम्मान - 'आकाशदीप' हिंदी भाषेसाठी प्रख्यात लघुकथा लेखिका ममता कालिया यांना आणि हिंदीतर भाषा श्रेणीमध्ये नामवंत मणिपुरी लेखिका अरामबम ओंगबी मेमचौबी यांना प्रदान करण्यात येणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले होते आणि २०२५ हे त्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे, तर २०२६ हे वर्ष देखील संयुक्त राष्ट्रसंघाने शेती क्षेत्रातील महिलांच्या योगदानाला समर्पित केले आहे. या पार्श्वभूमीवर, या दोन महिला साहित्यिकांचा सन्मान केला जात असल्याने या पुरस्काराला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ममता कालिया अरामबम ओंगबी या सन्मानाचे स्वरूप प्रत्येकी ५,००,००० रुपये रोख, प्रशस्तीपत्र मेमचौबी आणि प्रतीक म्हणून गंगा मूर्ती असे आहे. मणिपुरी भाषेतून आपल्या विपुल लेखनाद्वारे उत्तर-वसाहती विचार आणि स्त्री अस्मितेमध्ये विलक्षण योगदान देणाऱ्या अरामबम ओंगबी मेमचौबी यांचा जन्म १ जानेवारी १९५७ रोजी झाला.

त्यांचे मूळ नाव डॉ. थौनाओजम चानू इबेमहाल आहे. 'मैतेई' दंतकथांवरील त्यांच्या विशेष कार्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या मेमचौबी या समकालीन मणिपुरी साहित्य क्षेत्रातील एक प्रभावी व्यक्तिमत्व आहेत.

हिंदीतील सर्वोच्च 'आकाशदीप' शब्द सम्मानासाठी निवड झालेल्या ममता कालिया यांचा जन्म २ नोव्हेंबर १९४० रोजी झाला. स्त्रीवादाच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी आपल्या लेखनातून एक नवीन वाट निर्माण केली. अनेक उल्लेखनीय साहित्यकृतींचे लेखन केले असून, मध्यमवर्गीयांचे गुंतागुंतीचे जीवन आणि स्त्रियांचा संघर्ष प्रभावीपणे मांडण्यासाठी त्या ओळखल्या जातात. 'आकाशदीप' सन्मानांतर्गत आतापर्यंत हिंदीव्यतिरिक्त कन्नड, मराठी, बंगाली, ओडिया, मल्याळम आणि गुजराती भाषांना गौरवण्यात आले असून; यंदा मणिपुरी भाषेची निवड करण्यात आली आहे. हिंदीतर भारतीय भाषांच्या श्रेणीमध्ये गिरीश कर्नाड, भालचंद्र नेमाडे, शंख घोष, प्रतिभा राय, एम.टी. वासुदेवन नायर आणि सितांशु यशश्चंद्र हे या सन्मानाचे मानकरी ठरले आहेत; तर हिंदीमध्ये नामवर सिंह, ज्ञानरंजन, विश्वनाथ त्रिपाठी, शेखर जोशी, विनोद कुमार शुक्ल आणि गोविंद मिश्र यांना 'आकाशदीप' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## त्रिलोक नगरात सिमेंट कॉंक्रिट नालीचे लोकार्पण

### मूलभूत सुविधांच्या मजबुतीकडे महत्त्वाचे पाऊल

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**वाडी, दि. १८ :**



येथील प्रभाग क्रमांक ९ अंतर्गत त्रिलोक नगर परिसरात बांधण्यात आलेल्या सिमेंटकॉंक्रिट नालीचा लोकार्पण सोहळा नगरसेवक राजेश थोराने, नगरसेविका रेखाताई रोडे यांच्या हस्ते रविवार १८ जानेवारी रोजी पार पडला.

या नालीच्या लोकार्पणामुळे परिसरातील पावसाळ्यातील पाणी साचण्याची समस्या दूर होणार असून स्वच्छता व नागरी आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

नगरसेवक राजेश थोराने यांनी सांगितले की, ड्ढत्रिलोक नगर परिसरातील नागरिकांनी अनेक वर्षांपासून नालीच्या समस्येकडे लक्ष वेधले होते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून कॉंक्रिट नालीची उभारणी करण्यात आली आहे.

नगरसेविका रेखा रोडे यांनी स्वच्छ व नियोजित परिसर निर्माण करण्यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून विकासकामांना प्राधान्य दिले जाईल, असे नमूद केले.

यावेळी गोविंदराव रोडे, शैलेश थोराने माणूसमारे , बारसकर , देवेन माकोडे, विजय सिंग,भीमराव मेश्राम, योगेश कुमकुमवार, सचिन तिजारे, दिनेश उके यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१